रायगड, सोमवार, दि. १ एप्रिल २०२४

कृषीवल

किंमत ४ ₹

अडवाणींचा 'भारतरत्न'ने गौरव

नवी दिल्ली : देशाचे माजी उपपंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना रविवारी (दि. ३१) भारतरत्नने सन्मानित करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आदी उपस्थित होते. अडवाणींची प्रकृती ठीक नसल्याने त्यांच्या निवासस्थानी जाऊन राष्ट्रपतींनी हा सन्मान दिला. या कारणाने ते राष्ट्रपती भवनात आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नव्हते. शनिवारी राष्ट्रपतींनी राष्ट्रपती भवनात चार व्यक्तींना मरणोत्तर भारत रत्न देऊन सन्मान केला होता. यामध्ये माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह, पी.वी. नरसिम्हा राव, बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकुर आणि कृषि वैज्ञानिक डॉ. एमएस स्वामीनाथन यांचा समावेश होता.

काँग्रेसला पुन्हा नोटीस

नवी दिल्ली : ऐन निवडणुकीच्या काळात काँग्रेस पक्षासमोरील संकटे कमी होण्याची चिन्हे नाहीत. आता आयकर विभागाकडून काँग्रेसला नवीन नोटीस मिळाली आहे. ज्यामध्ये २०१४-१५ ते २०१६-१७ या वर्षांसाठी १,७४५ कोटींच्या कराची मागणी करण्यात आली आहे. या नव्या नोटिशीसह आयकर विभागाने काँग्रेसकडे एकूण ३,५६७ कोटींच्या कराची मागणी केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही नवीन कराची नोटीस २०१४-१५ (६६३ कोटी रुपये), २०१५-१६ (सुमारे ६६४ कोटी रुपये) आणि २०१६-१७ (सुमारे ४१७ कोटी रुपये) याच्याशी संबंधित आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान मोदींचा 'मॅच फिक्सिंग'चा प्रयत्न

रामलीला मैदानातून राहुल गांधींचा घणाघात

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून लोकसभा निवडणुकीसाठी मॅच फिक्सिंग करण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला. जर अशा पद्धतीनं भाजपानं निवडणूक जिंकली, तर देशातील संविधान संपेल आणि देशभरात आग लागेल, अशी चिंता राहुल गांधी यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर दिल्ली मद्य धोरण गैरव्यवहारप्रकरणी झालेल्या अटेकच्या कारवाईविरोधात इंडिया आघाडीने रविवारी (दि. ३१) एकत्र येत दिल्लीत 'लोकतंत्र बचाव महारॅली' काढली. यावेळी बोलताना राहुल गांधींनी देशाच्या सध्याच्या परिस्थितीवर भाष्य केले. या रॅलीच्या माध्यमातून विरोधी पक्षांनी सत्ताधारी भाजपावर जोरदार टीका केली. या रॅलीत देशभरातील २८ पक्ष सहभागी झाले होते.

•> पान २ वर

हा लोकशाहीवरील हल्ला : पवार

भाजपला विरोध करणाऱ्या खासदार, आमदार, मंत्री यांना बंदी बनवण्याचं काम या सरकारने केलं आहे. हा देशाच्या संविधानावरचा आणि लोकशाहीवरचा हल्ला असून, अशा हल्लेखोरांविरोधात मतदान करा ,असं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलं आहे.

पवार म्हणाले की, दिल्लीचे मुख्यमंत्री, झारखंडचे मुख्यमंत्री यांच्याविरोधात ज्या प्रकारची कारवाई भाजप सरकारने केली आहे, तो लोकशाही आणि देशाच्या संविधानावरचा हल्ला आहे. जर संविधान आणि लोकशाहीला वाचवायचं असेल, तर भाजपच्या अशा कृत्यांविषयी विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. ज्या प्रकारे केजरीवाल, सोरेन यांना जेलमध्ये टाकण्यात आलं किंवा महाराष्ट्र, पश्चिम बंगालचे आमदार-खासदार यांच्याविरोधात कारवाई केली गेली, तो लोकशाही आणि संविधानावर केलेला हल्ला आहे.

अब की बार, भाजपा तडीपार : ठाकरे

भारतीय जनता पक्ष 'अब की बार ४०० पार' असा नारा देते. पण, मी मुंबईत म्हणालो त्याप्रमाणे 'अब की बार, भाजपा तडीपार' म्हणत हुकुमशाहीचा अंत करा, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आघाडीच्या महारॅलीमध्ये केले. आम्ही सर्व इथे निवडणुकीच्या प्रचारासाठी नाही, तर लोकशाहीच्या रक्षणासाठी एकत्र आलो आहोत. कल्पना सोरेन आणि सुनिता केजरीवाल या हिंमतीने लढत असून, त्यांच्यामागे संपूर्ण देश उभा आहे. आपल्या देशाची वाटचाल हुकुमशाहीकडे सुरू असल्याचा संशय होता, मात्र हा संशय खरा ठरला आहे. अरविंद केजरीवाल आणि हेमंत सोरेन यांना अटक करून लोकांना भीती दाखवता येईल असे भाजपाला वाटत होते, पण त्यांनी देशवासियांना ओळखलेले नाही. देशातील नागरिक घाबरणारा नाही, तर लढणारा आहे, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला.

सरकारी तिजोरीत ३११४ कोटींचे मुद्रांक शुल्क

रायगड मुद्रांक शुल्क विभागाने गाठले महसूल उद्दिष्ट

। रायगड । सुयोग आंग्रे ।

कोरोनानंतर रायगड जिल्ह्यातील रियल इस्टेट क्षेत्रातील मंदी हळूहळू कमी होत आहे. वाढत्या महागाईमध्येही मालमत्ता खरेदीचे प्रमाण वाढले असून, वर्षभरात जिल्ह्यातून ३११४ कोटी रुपयांचा शुल्क जमा झाले आहे. जिल्ह्यात मालमत्ता खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो आहे. गतवर्षी सरकारने रायगडच्या मुद्रांक शुल्क नोंदणी विभागाला २ हजार १३० कोटींचे उद्दिष्ट दिले होते. यंदा ते वाढवून ३ हजार कोटींचे करण्यात आले आहे. आर्थिक वर्षअखेर मुद्रांक शुल्क विभागाने १०४ टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे. यामध्ये अलिबाग विभागाने १३७८ कोटी, तर पनवेलने १३२५ कोटी रुपयांचा महसूल गोळा करून उच्चांक गाठला आहे.

•> पान २ वर

> गतवर्षी दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा १० टक्के जादा मुद्रांक शुल्क वसूल करण्याची कामगिरी रायगड जिल्ह्याने केली आहे. गेल्या वर्षी दोन हजार १३० कोटींच्या महसुलाचे उद्दिष्ट होते. ते यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर सरकारने यंदा उद्दिष्ट वाढवून तीन हजार कोटी केले आहे. आतापर्यंत १०४ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. आगामी काळात अधिक उद्दिष्ट रायगड विभाग पूर्ण करेल.
> – श्रीकांत सोनावणे, सहजिल्हा निबंधक, रायगड

कशातून मिळतो मुद्रांक शुल्क

वस्तू व सेवा करानंतर सर्वाधिक महसूल मिळवून देणारा विभाग अशी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाची ओळख आहे. जमीन, सदनिका, दुकाने आदींची खरेदी-विक्री, दोन व्यक्ती किंवा संस्थांमध्ये होणारे करार, बक्षीसपत्र, भाडेकरार अशा विविध दस्तांची नोंदणी करताना मुद्रांक शुल्क लागते. मुद्रांक शुल्कातून नोंदणी विभागाला हा महसूल मिळतो.

पटेल ज्वेलर्स
एक वादा Guaranteed दाम का
62,400 : 22 KT
Tel No : 022 31040000 / 1800 121 1090
Panvel, Pen, Uran, Mehsana, Modasa, Lunawada

आजचा अग्रलेख
रंगीत नसलेले चित्र

नीलम गोऱ्हेंकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन

● शेकाप नेत्या माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांच्या निधनाची बातमी समजताच रविवारी (दि. ३१) विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी पेझारी येथे पाटील कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. (संबंधित वृत्त पान ३ वर)

नेत्यांची मने जुळली; कार्यकर्ते मात्र नाराज

तटकरेंची डोकेदुखी वाढली, गीतेंना पोषक वातावरण

। रायगड । खास प्रतिनिधी ।

धैर्यशील पाटील यांनी आपली तलवार म्यान केल्याने त्यांचे समर्थ नाराज असल्याची चर्चा आहे. आता ४ जूनला निकाल लागल्यानंतरच पेणमधील संपर्क कार्यालय उघडा, तोपर्यंत त्याला टाळे ठोका, असाही एक मतप्रवाह पेणमध्ये आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना पाटील यांची चांगलीच दमछाक होत असल्याचे दिसून येते. पदाधिकारी आणि नेत्यांची मने जुळली असली, तरी भाजपाचे कार्यकर्ते नाराज असल्याने सुनील तटकरेंसाठी डोकेदुखी वाढली आहे. दुसरीकडे इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्यासाठी अधिक पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

पेण संपर्क कार्यालय बंद करण्याची मागणी

शेकापबरोबर फारकत घेत धैर्यशील पाटील यांनी भाजपाची वाट चोखाळली. पक्ष प्रवेशापूर्वी रायगडमधील भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यामध्ये चांगलीच हवा भरली होती. त्यामुळे पाटील यांनादेखील दिवसादेखील दिल्ली दिसत असावी. निष्ठेसाठी त्यांनी भाजपाचा अजेंडा राबवण्यास सुरुवात केली. विविध कार्यक्रम, सभा घेतल्या, बूथ पातळीवरील कार्यक्रम हाती घेतले. त्यामध्ये त्यांची आर्थिक शक्तीही खर्च झाली.

आपल्यालाच लोकसभेची उमेदवारी मिळावी यासाठी त्यांनी वरिष्ठांमार्फत चांगलीच फिल्डींग लावली होती. मात्र, ऐन धामधुमीत सुनील तटकरे यांनी उमेदवारी मिळवत धैयशील पाटील यांच्यासह भाजपा पदाधिकाऱ्यांचीच विकेट काढली. मुंबईतील बैठकीमध्ये पक्षश्रेष्ठींसमोर तटकरेंना मदत करणार असल्याचे एकमुखाने सर्व पदाधिकारी आणि नेत्यांनी मान्य केले असले, तरी कार्यकर्ते मात्र चांगलेच नाराज असल्याचे चित्र आहे.

भाजपामधील हेच कार्यकर्ते सुनील तटकरेंसाठी •> पान २ वर

वेधक

भुजबळांच्या अडचणीत वाढ

मुंबई : महाराष्ट्र सदन बांधकामातील ८५० कोटींच्या आर्थिक अफरातफर प्रकरणात ईडीने २०१६मध्ये मंत्री छगन भुजबळ, पंकज भुजबळ व समीर भुजबळ यांच्यासह एकूण ५२ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. २०२१ मध्ये सबळ पुरावे नसल्याचे सांगत छगन भुजबळ यांना मुंबई सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. छगन भुजबळ, मुलगा पंकज, पुतण्या समीरसह पाच जणांना न्यायालयाने दोषमुक्त केले होते. यानंतर अंजली दमानिया यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका केली होती. याप्रकरणी उद्यापासून म्हणजेच १ एप्रिलपासून पुन्हा सुनावणी होणार आहे.

धीरेंद्र शास्त्रींविरोधात गुन्हा दाखल

भंडारा : मानव धर्माचे संस्थापक बाबा जुमदेव आणि त्यांच्या सेवकांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणारे बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री महाराज यांच्यावर अखेर मोहाडी पोलीस ठाण्यात धार्मिक भावना भडकविल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

कामोठे वसाहत की गॅस चेंबर?

- वसाहतीतील नागरिकांचा संतप्त सवाल
- रात्रीच्या वेळी वायू प्रदूषणात मोठी वाढ

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

सिडकोने नागरिकांच्या राहण्यासाठी कामोठे वसाहत वसवली आहे की नागरिकांच्या आरोग्यावर होणारा वायू प्रदूषणाच्या परिणामाची चाचणी करण्यासाठी गॅस चेंबरची निर्मिती केली आहे, असा संतप्त सवाल वसाहतीमधील नागरिक व्यक्त करत आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे याबाबत वारंवार तक्रार करूनही वायू प्रदूषण रोखण्यासाठी कोणतीही पावले प्रदूषण नियंत्रण मंडळ उचलत नसल्याने माणसे मेल्यावरच महामंडळाला कदाचित जाग येणार असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. आपल्या मुलाबाळांचं राहणीमान उंचवावं, त्यांना आरोग्याच्या प्रश्नांना सामोरे जावे लागू नये, या हेतूने अनेकांनी कामोठेसारख्या सिडकोने वसवलेल्या वसाहतीत कर्ज काढून घरे खरेदी •> पान २ वर

> प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे याबाबत तक्रार केली असता काही दिवस या त्रासातून मुक्तता होते. मात्र, काही दिवसांनंतर पुन्हा असले प्रकार सुरु होत असल्याचे पाहायला मिळते.
> – अमोल शितोळे, अध्यक्ष, शेकाप कामोठे शहर

निधी खर्च करण्यात रायगडची हॅट्ट्रिक

सलग तिसऱ्या वर्षी जिल्हा ठरला अव्वल

। रायगड । खास प्रतिनिधी ।

जिल्हा नियोजन समितीचा निधी खर्च करण्यात सलग तिसऱ्या वर्षी रायगड जिल्ह्याने बाजी मारली आहे. ३६० कोटी रुपये खर्च करण्यात रायगड जिल्ह्याला यश आले आहे.

निर्धारित वेळेआधीच जिल्हा नियोजन समितीचा निधी खर्च झाल्याने रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी प्रशासनाचे कौतुक केले आहे. याआधी सरकारने विविध कारणांनी विकासकामांना ब्रेक लावला होता. तसेच ग्रामपंचायतीच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने जिल्ह्यातील विकास रखडला होता. अधूनमधून सर्व्हर डाऊन होत असल्याने सरकारी कामांना चांगलाच फटका बसत होता. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विविध विकासकामांना निधी वितरण आणि प्रशासकीय मान्यता देताना बराच मनस्ताप सहन करावा लागला होता. काही कामांना उशिरा मान्यता आल्याने वेळेत निधी खर्च होणार की नाही याबाबत शंका उपस्थित करण्यात आली होती.

३६० कोटी रुपयांचा निधी मार्चअखेर खर्च करण्याचे आव्हान जिल्हा नियोजन समितीकडे होते सातत्याने पाठपुरावा करून विकासकामांच्या •> पान २ वर

> २०२३-२४ साठी ३६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सरकारकडून तेवढाच निधी प्राप्त झाल्यानंतर सर्व निधी वितरीत करण्यात आला. २०२२-२३ साली ३३० कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला होता, तर २०२१-२२ साली ३०० कोटी रुपयांचा निधी निर्धारीत वेळेत खर्च करण्यात आला होता.

ई-रिक्षाचे दर निश्चित करा

- स्थानिकांची आरटीओकडे मागणी

। माथेरान । वार्ताहर ।

महिन्याला लाखो रुपये पगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांना ई-रिक्षाच्या भाड्यात सवलत देताना सर्वसामान्यांना मात्र ३५ भाडे आकारण्यात आले असून, त्यांना ताटकळत उभे राहावे लागते. दरम्यान, आगामी काळात आणखीन २० ई-रिक्षांची माथेरानकरांच्या सेवेत दाखल होणार आहेत. तरी, आरटीओने यामध्ये लक्ष घालून सर्वसामान्यांना परवडणारे दर निश्चित करावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांची आहे.

श्रमिक हातरिक्षा चालकांच्या ताब्यात ई-रिक्षा द्याव्यात असे सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिलेले असतानादेखील सनियंत्रण समितीच्या हेकेखोर वृत्तीमुळेच सध्या पायलट प्रोजेक्टवर केवळ ठेकेदाराला पोसण्यासाठी या समितीने ई-रिक्षाचा ठेका दिलेला असून, दस्तुरी ते माथेरान रेल्वे स्टेशनदरम्यान प्रति मानसी ३५ रुपये, दर आकारण्यात येत आहे. सहा ते सात •> पान २ वर

हजारो शेतकरी, उत्पादक, निर्यातदार, वाहतूकदारांना फटका

निर्यातबंदीने कांद्याचा वांदा; उलाढाल ठप्प

जेएनपीए बंदरातून होणारी निर्यात शून्यावर

। चिरनेर । प्रतिनिधी ।

आधी कांदा निर्यात शुल्कात केलेली वाढ त्यानंतर चार महिन्यांपूर्वी कांदा निर्यातीवर घालण्यात आलेली बंदी यामुळे जेएनपीए बंदरातून महिन्याकाठी सुमारे चार हजार कंटेनर कार्गोमधून एक लाख टन होणारी कांद्याची निर्यात ठप्प झाली आहे. केंद्र सरकारच्या या कांद्याच्या निर्यातीवर घातलेल्या बंदीचा फटका हजारो शेतकऱ्यांनाच नव्हे तर, शेकडो उत्पादक, निर्यातदार, वाहतूकदार आणि संबंधित कांदा निर्यातीच्या रोजगारावर अवलंबून असलेल्या लाखो कामगारांना बसला आहे. गेल्या चार महिन्यांत आपण दोन हजार कोटींच्या परकीय चलनाला मुकलो आहोत.

जेएनपीए बंदरातूनच महिन्याकाठी राज्यभरातील शेतकऱ्यांचा चार हजार कंटेनर कार्गोमधून सुमारे एक लाख टन कांद्याची आयात करण्यात येत होती. आशिया खंडातील मलेशिया, थायलंड, सिंगापूर, दुबई, कतार आणि इतर काही देशांत होणाऱ्या कांदा निर्यातीच्या शुल्कात केंद्र सरकारने ऑगस्ट २०२३ मध्ये अचानक ४० टक्क्यांनी वाढ केली होती.निर्यात शुल्कात केलेली वाढ परवडत नसल्याने व्यापाऱ्यांनी कांदा निर्यात बंद केली होती.

यामुळे निर्यातीअभावी जेएनपीए बंदरातच ४०० कंटेनर कांदा अडकून पडला होता.अडकून पडलेला कांदा सडून गेल्यामुळे कांदा निर्यात व्यापाऱ्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जाण्याची वेळ आली होती.

यामुळे केंद्र सरकारने अचानक केलेल्या शुल्क वाढीमुळे निर्यातदार व्यापारी संतप्त झाले होते. कांद्याच्या निर्यात शुल्क वाढीनंतर गेल्या ७ डिसेंबरपासून केंद्र सरकारने देशांतर्गत कांदा उपलब्धता व दर नियंत्रणात ठेवण्याच्या नावाखाली ३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातबंदी केली होती. •> पान २ वर

> कांदा निर्यातबंदी उठवण्याची आता शेतकऱ्यांना नवे केंद्र सरकार सत्तेवर येईपर्यंत वाट पाहावी लागणार आहे. या दरम्यान कोणताही निर्णय होणार नसल्याने दुर्दैवाने शेतकरी, व्यापाऱ्यांना आर्थिक नुकसानीला आणि अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे.
> – अजित शहा, अध्यक्ष, मुंबई हॉल्टीकल्चर असोसिएशन

> कांदा निर्यातबंदीआधी जेएनपीए बंदरातूनच महिन्याकाठी सुमारे चार हजार कंटेनरमधून एक लाखाहून अधिक टन कांद्याची निर्यात केली जात होती. मात्र, केंद्र सरकारच्या कांदा निर्यातबंदीनंतर बंदरातील कांद्याची निर्यात ठप्प झाली आहे. यामुळे कांद्याच्या निर्यातीवर घातलेल्या बंदीचा फटका हजारो शेतकऱ्यांनाच नव्हे तर, शेकडो उत्पादक, निर्यातदार, वाहतूकदार आणि संबंधित कांदा निर्यातीच्या रोजगारावर अवलंबून असलेल्या लाखो कामगारांना बसला आहे. कांद्याला उठाव नसल्याने शेतकऱ्यांची अवस्था तर घर का ना घाट का अशी झाली आहे.
> – राहुल पवार, श्वान ओव्हरहेड एक्स्पोर्ट-इंपोर्ट कंपनी

रायगडातील महामार्ग बनताहेत मंडई

ताज्या भाज्यांबरोबर फळांची विक्री वाढली

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याची औद्योगिक जिल्हा अशी ओळख असली तरी रायगड जिल्ह्याने पर्यटन क्षेत्रात चांगली कामे कारण्यास सुरुवात केली आहे. मुंबई आणि पुणे या आर्थिक उलाढाल करणाऱ्या प्रमुख जिल्ह्यांना लगतचा असणारा जिल्हा रायगड आहे. आर्थिक केंद्रबिंदू बनू पाहणाऱ्या रायगड जिल्ह्यात जनतेला अपेक्षित असणारे मॉल उभे राहिले नसले तरी भाज्या आणि फळे खरेदी-विक्रीसाठी सहज जागा उपलब्ध झाली आहे. रायगड जिल्ह्यातील भाजीपाल्याला जिल्ह्यातून जाणारे महामार्ग बाजारपेठ बनले आहेत. मुंबई-गोवा महामार्ग आणि मुंबई-पुणे महामार्ग फ्रूट व्हेजिटेबल मॉल बनत आहेत असे •> पान २ वर

> महामार्ग रोजंदारीसाठी उपयुक्त ठरला आहे. गावापासून दूर असलातरी महामार्गाच्या बाजूला भाजी आणि फळे विकण्याची संधी मिळत असल्याने रोजगार उपलब्ध झाला आहे. प्रतिदिनी दिवसाचा रोजगार आणि नफा कमावता येतो. भाजी स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतातून येत असल्याने वाहतुकीचा खर्च वाचतो. यामुळे आम्हाला भाजी विक्री करणे परवडते. दैनंदिन विक्रीतून आरोग्याचा खर्च वगळून घर खर्च निघतो. – रसिका पाटील, हमरापूर

मुंबई-गोवा महामार्ग आणि मुंबई-पुणे महामार्गावर पालेभाज्यांबरोबरच फळांच्या खरेदीलादेखील पर्यटकांची आणि स्थानिकांची अधिक पसंती आहे. स्थानिक शेतकरी ही फळे येथे लागवड करून पीक घेत नसलेतरी येथे विक्रीसाठी लावण्यात आलेल्या फळांचा ताजेपणा पर्यटकांना आकर्षित करीत आहे. एखाद्या शहरात फळे मिळणार नाहीत अशा सर्व प्रकारची फळे या स्टॉलवर उपलब्ध होत असल्याने हायवे फ्रुट व्हेजिटेबल मॉल पर्यटकांच्या पसंतीस उतरला आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ एप्रिल

१)श्री.परशुराम लक्ष्मण पाटील
रा.नवेदर बेली, अलिबाग,

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

श्री. बाळाराम केशव पाटील, वाढदिवस, अलिबाग

रस्त्यासाठी शेकडो झाडांची कत्तल

- **वन विभागाचा झाडे न तोडल्याचा दावा**
- **ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची जैतू पारधींची मागणी**

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ माथेरान घाट रस्त्याने माथेरान येथील जंगलातून गार्बेटवाडीकडे जाणारा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून बनविण्यात येत आहे. तीन किलोमीटर लांबीचा रस्ता बनविण्यासाठी २००हून अधिक झाडे तोडण्यात आली आहेत. दरम्यान, वन विभागाने रस्त्यासाठी ३/२ मधून प्रस्ताव करून वनजमीन रस्त्यासाठी दिली आहे. मात्र, झाडे तोडण्याची परवानगी दिली नव्हती. त्यामुळे संरक्षित वन असलेल्या माथेरान परिक्षेत्रमधील झाडे तोडल्याबद्दल संबंधित कामाचे ठेकेदार यांच्यावर शासन कधी कारवाई करणार, असा सवाल माथेरान डोंगरातील १२ आदिवासी वाड्यांमधील आदिवासी बांधव विचारत आहेत.

माथेरान डोंगरात कर्जत तालुक्यातील १३ आदिवासी वाड्या तसेच खालापूर तालुका हद्दीमधील एक वाडी माथेरानच्या पूर्व भागात आहेत. त्यातील ४० घरांची वस्ती असलेल्या गार्बेटवाडीकडे जाण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ता बनविला जात आहे. नेरळ-माथेरान घाटरस्ता येथून या वाडीकडे जाणारी पायवाट होती आणि घाट रस्त्याने वाडीपर्यंत जाणारा रस्ता साधारण तीन किलोमीटर लांबीचा आहे. पूर्वीच्या पायवाट असलेल्या रस्त्यावरून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा रस्ता नेण्यासाठी शासनाच्या वन विभागाची जमीन मिळावी यासाठी प्रस्ताव देण्यात आला होता. त्यावेळी जमीन देताना कोणत्याही झाडाचे नुकसान होणार नाही, या अटीवर रस्त्यासाठी जमीन वन विभाग यांच्याकडून देण्यात आली होती. वन अधिकारी उमेश जंगम यांनी रस्त्यात कोणतीही झाडे येत नाहीत आणि पूर्वीच्या जुन्या रस्त्यावर नवीन रस्ता केला जाणार आहे. मात्र, पूर्वीचा रस्ता हा पायवाट होता आणि पायवाट ही केवळ बैलगाडी जाणारी

वाट असते, मात्र सध्या त्या ठिकाणी तब्बल तीन मीटर रुंदीचा रस्ता बनविला जात आहे.

दरम्यान, रस्ता बनविताना असंख्य झाडे जमीनदोस्त करण्यात आली आणि पूर्वीच्या पायवाट रस्त्यावर खोदकाम करण्यात आले. हे खोदकाम करण्यासाठी पोकलेन मशीनचा वापर करण्यात आला आहे. या मशीन आजदेखील माथेरान घाट गार्बेट वाडीच्या रस्त्यावर तैनात आहेत. या वाडीमध्ये रस्ता नेण्याबद्दल स्थानिक माथेरान डोंगरातील कोणालाही आक्षेप नाही. मात्र, अन्य वाड्यांमध्ये रस्ता नेण्यासाठी वन विभाग जमीन देत नाही, झाडे तोडली जातील अशी कारणे देत आहेत. पण गार्बेट वाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर २०० हून अधिक झाडे तोडण्यात आली आहे. त्या झाडांची नोंद वन विभागाने आजपर्यंत घेतली नाही. कोणत्याही सरकारी यंत्रणा रस्त्याचे काम सरकारी नियम धडकावून होत असताना ते काम बघायला एकही सरकारी कर्मचारी पोहोचत नाही, असा आरोप माथेरान डोंगरातील १२ आदिवासी वाड्यासाठी रस्ता व्हावा म्हणून गेली दहा वर्षे प्रयत्न करणारे आदिवासी कार्यकर्ते गणेश पारधी यांनी केला आहे.

माथेरानचे पर्यायी रस्ते बनविताना नकारघंटा

माथेरान या जगातील दर्जाच्या पर्यटन स्थळांवर पर्यटक येत असतात.त्यांना माथेरान येथे येण्यासाठी एकमेव रस्ता असून माथेरान मधील जनता पर्यायी मार्गाची मागणी करीत आहे.मात्र वनविभाग आपली जमीन देत नाही. गार्बेट वाडी सारखा न्याय वन विभागाने माथेरानचे पर्यायी मार्गाला देण्यात यावा, अशी मागणी माथेरान वन व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष आणि माथेरान नागरी पतसंस्थेचे तज्ञ संचालक गिरीश पवार यांनी केली आहे.त्याचवेळी तेथे तोडण्यात आलेली झाडे खोदलेल्या केलेल्या रस्त्यात गाडून टाकण्याची कृती ठेकेदार करीत आहे याचा शोधदेखील प्रशासनाने घ्यावा.

> **माथेरान मध्ये एकही झाड तोडता येत नाही, तसेच मृत व्यक्तींना जाळण्यासाठीदेखील लाकडे दिली जात नाहीत. मग रस्त्यासाठी २०० हून अधिक जुनी आणि मोठी झाडे तोडणाऱ्या ठेकेदारावर शासन कारवाई कधी करणार असा आमचा प्रश्न आहे. त्याचवेळी तोडलेली झाडे पुन्हा लावण्याचा नियमदेखील या ठेकेदाराला लावण्यात आला आहे याचीदेखील शासनाने चौकशी करावी, अशी आमची मागणी आहे.**
> **– जैतू पारधी**

एसटी बसचालकाची मनमानी

गाडी रिकामी असूनही थांबली नाही ; प्रवाशांचा आरोप

। अलिबाग । प्रतिनिधी ।

'हात दाखवा, एसटी थांबवा' या एसटी परिवहन महामंडळाच्या ब्रीदवाक्याला हरताळ फासण्याचे काम एसटी बसच्या चालकाकडून केल्याची घटना रविवारी (दि. ३१) घडली. रोहा बस आगाराची सकाळी १० वाजता सुटलेली रोहा-रेवदंडा एसटी बस महादेवखार येथे आली असता येथील बसथांब्यावर न थांबवता पुढे नेली. चालकाच्या मनमानीपणामुळे प्रवाशांवर ताटकळत राहण्याची वेळ आली. याबाबत प्रवशांकडून संताप व्यक्त करण्यात आला. तर, यापुढे बसचालकाला समज देण्यात येईल, असे आश्वासन रोहा आगारप्रमुख यांनी दिले.

याबाबत हकीकत अशी की, रोहा बसस्थानकातून सकाळच्या सुमारास सुटणारी रोहा-रेवदंडा (एमएच १२ बीटी २६५३) ही एसटी बस या मार्गावरील महादेवखार येथे आली असता याठिकाणी गाडी वाट पाहात उभ्या असणारी तिला हात दाखवला. यावेळी जवळपास १० ते १२ प्रवासी या बसथांब्यावर गाडी वाट पाहात उभे होते. त्यातील काहींना डॉक्टर उपचारासाठी यायचे होते. परंतु, गाडी न थांबल्याने त्यांना रुग्णालयात पोहोचण्यास उशीर झाल्याचे प्रवाशांनी सांगितले. गाडी पूर्ण रिकामी असतानाही चालकाने गाडी थांबवली नाही, असा आरोप या प्रवाशांनी केला आहे. एसटी प्रशासनातील अशाच मुजोर चालकांमुळे एसटी व्यवस्था डबघाईला आली असल्याचा संताप प्रवाशांनी व्यक्त केला. दरम्यान, रोहा आगारप्रमुख अजिंक्य रोहेकर यांच्याशी संपर्क साधला असता बसचालकाला समज देण्यात येईल, असे कृत्य करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

पंढरीनाथ ठाकूर यांचे निधन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील खोपटे-धसाखोशी येथील निवृत्त मुख्याध्यापक पंढरीनाथ जानबा ठाकूर (८८) यांचे पनवेल-कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार घेत असताना खद निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर खोपटे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. पंढरीनाथ पाटील यांनी रायगड जिल्ह्यात १९६३पासून रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षक पदावर कार्यरत असतानाच त्यांनी आपल्या ज्ञानदानातून अनेक विद्यार्थी घडविले आहेत. तर १९७६ मध्ये आणीबाणीच्या काळात पोलादपूर तालुक्यात मुख्याध्यापक पदावर शिक्षण सेवा केली.

पान १ वरून

'मॅच फिक्सिंग'चा प्रयत्न

या महारॅलीला सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खरगे, शरद पवार, उद्धव ठाकरे फारूक अब्दुल्ला, सिताराम येचूरी, डी. राजा, राहुल गांधी, अखिलेश यादव, तेजस्वी यादव, प्रियंका गांधी, सुनिता केजरीवाल, एमके स्टॅलिन, चंपई सोरेन, कल्पना सोरेन यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

राहुल गांधी म्हणाले, सध्या आयपीएलचे सामने सुरू आहेत. जेव्हा बेईमानीने अंपायरवर दबाव टाकून, खेळाडूंना विकत घेऊन किंवा कर्णधाराला घाबरवून मॅच जिंकल्या जातात, तेव्हा क्रिकेटमध्ये याला मॅच फिक्सिंग म्हटलं जातं. आपल्या समोर लोकसभेच्या निवडणुका आहेत. त्यामध्ये अशाच पद्धतीने मॅच फिक्सिंग सुरू आहे, असं म्हणत अंपायर कोणी निवडले तर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी. त्यांनी मॅच सुरू होण्यापूर्वीच आमच्या संघातील दोन खेळाडूंना अटक केली. त्यामुळे या निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी मॅच फिक्सिंग करण्याचा प्रयत्न करत आहेत, असा थेट आरोप राहुल गांधींनी केला आहे. तसंच, '४०० पार' जागा जिंकण्याची भाजपाकडून घोषणा केली. मात्र, ईव्हीएम, मॅच फिक्सिंग, प्रेसवर दबाव न टाकता हे १८० सुद्धा जागा जिंकणार नाहीत, असा हल्लाबोलही राहुल गांधी यांनी यावेळी केला आहे.

३११४ कोटींचे मुद्रांक शुल्क

मुद्रांक शुल्क वसुलीवरून रायगड जिल्ह्यात सर्वाधिक व्यवहार पनवेल, कर्जत, खालापूर, उरण, अलिबाग या तालुक्यामध्ये होत आहेत. अविकसित असलेल्या पोलादपूर, म्हसळा, तळा हे तालुकेही यात मागे नसून, या तालुक्यांमधूनही वर्षाला कोट्यवधींचा महसूल सरकारी तिजोरीत जमा होत आहे. वाढीव उद्दिष्टामध्येही याच तालुक्यांची कामगिरी उत्तम असल्याचे जमा झालेल्या मुद्रांक शुल्काच्या रकमेवरून दिसते. या उत्पन्नातून सरकारकडून विविध मोठे प्रकल्प हाती घेतले जातात. रस्ते, सिंचन प्रकल्प, विमानतळ, मेट्रो प्रकल्प आदींबरोबर विविध विकासकामे सुरू करता येतात. विकासकामांसाठी शासनाला मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असते.

पनवेल, खालापूर, कर्जत परिसरात नव्याने सुरू झालेल्या गृहप्रकल्पांमध्ये घरे घेण्यास मुंबईतील ग्राहक इच्छुक असतात. कोरोनानंतर ही वाढ प्रकर्षाने दिसते. गतवर्षी २०२२-२३ या वर्षासाठी शासनाने रायगड जिल्ह्याच्या नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाला दोन हजार १३० कोटींचे उद्दिष्ट दिले होते. तर, प्रत्यक्षात दोन हजार ३५० कोटींचा महसूल जमवून ११० टक्क्यांपर्यंत उद्दिष्ट साध्य करण्यात रायगडला यश आले होते. यावर्षी तीन हजार कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी मार्चअखेर होईपर्यंत तीन हजार ११४ कोटी रुपयांचा म्हणजेच १०४ टक्के महसूल मुद्रांक शुल्क विभागाने जमा केला आहे. असे असले तरी मुरूड, श्रीवर्धन, तळा, म्हसळा आणि पोलादपूर या पाच तालुक्यांमध्ये विकास कूर्म गतीने झाल्याने कमी महसूल जमा झाला आहे.

रेडिरेकननुसार ठरते मुद्रांक शुल्क

मुद्रांक शुल्क किती आकारणार, याबाबत काही मूलभूत नियम आहेत. यात किमान आणि कमाल जागेच्या आकारानुसार मुद्रांक शुल्क आकारले जाते. रेडिरेकनर दरावरून स्टॅम्प ड्युटी किती लागेल, हे कळू शकते. रेडिरेकनरच्या तक्त्यात मालमत्तेविषयी प्रति चौरसमीटर काय दर आहे, त्यानुसार मुद्रांक शुल्क ठरते आणि आकारण्यात येते. दरवर्षी १ एप्रिल रोजी नवे वार्षिक बाजारमूल्य दर (रेडिरेकनर) लागू होतात. जे प्रत्येक विभागासाठी वेगवेगळे असते.

तालुकानिहाय वसूल शुल्क (२०२३-२४)
तालुका/ दस्त नोंदणी उद्दिष्ट/ जमा महसूल
अलिबाग - ८,८६,५८५ - १३७८ कोटी ९७लाख
पनवेल - २,०६,२०४ -१३२५ कोटी २२ लाख
कर्जत - २५,८४८ -१३६ कोटी ८१ लाख
पेण - ७,७४६ - ३१ कोटी ७५ लाख
रोहा - ७,१०३ -१८ कोटी १८ लाख
महाड - ८,४२८ - १७ कोटी २५ लाख
माणगाव - ७,८२५ -१४ कोटी ५२ लाख
श्रीवर्धन - २,२९५ - ७ कोटी ३१ लाख
मुरुड - १,४४० - ६ कोटी ९९ लाख
उरण - १०,१९४ - ५५ कोटी २० लाख
खालापूर - १४,७५० - १२१ कोटी ७४ लाख
तळा - १,१६८ - २ कोटी ८८ लाख
म्हसळा -१,३७४ - ३ कोटी १३ लाख
सुधागड - ४,६०१ -१८ कोटी ३६ लाख
पोलादपूर - १,१७३ - १ कोटी ८७ लाख

नेत्यांची मने जुळली, कार्यकर्ते नाराज

डोकेदुखी ठरणार आहेत. धैर्यशील पाटील यांना महायुतीतून उमेदवारी मिळाली नाही, तर त्यांनी अपक्ष लढावे अशी कार्यकर्त्यांची इच्छा होती. पाटील यांनी तलवार म्यान केल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. तटकरेंच्या प्रचाराबाबत त्यांच्यामध्ये निरुत्साही वातावरण आहे. त्यामुळे तटकरेंसाठी लढाई कठीण असली, तरी इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्यासाठी हे पथ्यावर पडणार असल्याचे दिसते. तटकरेंवर नाराजी असल्याने हे कार्यकर्ते कोणाच्या पारड्यात मतदान करणार याबाबतही संभ्रम आहे.

कामोठे वसाहत की गॅस चेंबर?

केली आहेत. सद्यःस्थितीत मात्र नागरिकांनी घरे खरेदी करताना ठेवलेल्या अपेक्षा भंग पावल्याचे पाहायला मिळत आहेत. वसाहतीत रात्रीच्या सुमारास मोठ्या प्रमाणात हवेतील प्रदूषण होत आल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. वसाहतीमधील खाडी किनारे असलेल्या भागातील नागरिकांना यामुळे डोळे चुरचुरणे, मळमळ होणे, उलट्या होणे यासारख्या त्रासाचा सामना करावा लागत असल्याने नागरिकांचे जीवन असह्य झाले असल्याचा आरोप करत प्रदूषण करणाऱ्यांचा शोध घेऊन कारवाई करण्यात यावी, अशी मागणी येथील नागरिक करत आहेत.

कांद्याचा वांदा; उलाढाल ठप्प

कांदा निर्यातबंदी केल्याने हजारो शेतकरी अडचणीत आले आहेत. कांदा निर्यातबंदीची मुदत आठ दिवसांतच संपणार होती. त्यामुळे कांदा निर्यातबंदी उठेल, अशी आशा असतानाच केंद्राने पुन्हा कांदा निर्यातबंदी अनिश्चित काळासाठी कायम केली आहे. सरकारच्या निर्यातबंदीमुळे शेतकऱ्यांचे मात्र कंबरडं मोडलं. यंदा एक तर कमी पावसामुळे दुष्काळी परिस्थिती असली तरी बाजारात कांद्याची आवकही चांगली असताना दोन पैसे मिळतील अशी अपेक्षा शेतकरी बाळगून होते. परंतु, कांदा निर्यात बंदी घालून शेतकऱ्यांच्या स्वप्नांवर केंद्र सरकारने पुन्हा एकदा पाणी फेरले आहे.

दर महिन्याला जेएनपीए बंदरातून चार हजारांहून अधिक कांद्याच्या कंटेनर कार्गोची निर्यात केली जात होती. कांद्याच्या एका कंटेनर निर्यात खर्च ६ ते ७ लाखांच्या घरात होता.त्यामुळे जेएनपीए बंदरातून प्रत्येक महिन्याला चार हजार कंटेनरची निर्यात डिसेंबर ते मार्च अशी चार महिने होणारी कांद्याची ठप्प झाली आहे. यामुळे बंदरातील प्रतिमाह २४०० कोटी अशी चार महिन्यांतील ९६०० कोटींची उलाढालही थांबली आहे. या चार महिन्यांत शेतकऱ्यांनाही सुमारे दोन हजार कोटींच्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. केंद्र सरकारच्या कांदा निर्यातबंदीमुळे शेतकरी, व्यापारी, निर्यातदारांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक कोंडी झाली आहे, अशी प्रतिक्रिया इरफान मेनन, कांदा निर्यातदार व्यापारी यांनी दिली.

रायगडातील महामार्ग बनताहेत मंडई

म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

रायगड जिल्हा पर्यटन जिल्हा असल्याने देश-विदेशातील पर्यटक रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारे आणि गडकिल्ल्यांना भेटी देतात. येणारे पर्यटक आपापली चारचाकी आणि दुचाकी वाहने घेऊन रायगड जिल्ह्यात दाखल होतात. त्याचबरोबर तळकोकणात जाणारे चाकरमानी आणि पुणे, सातारा आणि कोल्हापूर बाजूला जाणारे प्रवासीदेखील जिल्ह्यातून जाणाऱ्या महामार्गाचा वापर करतात. येणारे पर्यटक किंवा प्रवासी रायगड जिल्ह्यातून पालेभाज्या आणि फळे घेऊन जाणे पसंत करीत असल्याचे आजचे चित्र आहे. मुंबई-गोवा महामार्ग आणि मुंबई पुणे महामार्गावर लगतच्या जागेत वाहने पार्क करून भाजी आणि फळे खरेदी साठी झुंबड उडत आहे.

रायगड जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गावर पेण तालुक्यातील हमरापूर, जिते, वडखळ, माणगाव शहरातील बाजारपेठ , पोलादपूर शहरातील बाजारपेठे त्याचबरोबर खालापूर तालुक्यातील खालापूर नाका, चौक, रसायनी फाटा येथे पालेभाजी विक्रीचे झाडांच्या पानाचे स्टॉल उभाण्यात आले आहेत. स्थानिक शेतकऱ्यांनी पिकविलेल्या ताज्या भाज्या खरेदी करण्यासाठी या स्टॉलसमोर बीएमडब्ल्यू , मर्सिडीजसारख्या गाड्यादेखील थांबत आहेत. स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतातून थेट आलेली भाजी असल्याने आणि भाजीचे दर कमी असल्याने खरेदी करण्यासाठी झुंबड उडत आहे.

भाजी स्थानिक शेतकऱ्यांकडून मिळते. परंतु, ताजी फळे आणण्यासाठी पनवेल, नवी मुंबई येथे जावे लागते. महामार्गवरील वाहनांची वर्दळ आणि भाजी, फळे खरेदी करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. दिवसभरात भाजी आणि फळांची चांगली विक्री होते. ताजी भाजी आणि फळे मिळत असल्याने ग्राहक खरेदीसाठी आवर्जून थांबतात. रोज होणारी विक्री सुखावणारी असतेच असे नाही; परंतु, महामार्गामुळे रोजगार उपलब्ध झाला आहे, असे नवीन पाटील, हमरापूर यांनी सांगितले.

ई-रिक्षाचे दर निश्चित करा

मिनिटांत हे अडीच किलोमीटर अंतर ई-रिक्षाच्या प्रवासासाठी लागते. तर, शालेय विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करण्यासाठी फक्त पाच रुपये इतका माफक दर ठेवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, काही महिने येथील शासकीय अधिकारी, कर्मचारी वर्गाला दस्तुरी-माथेरान-दस्तुरी या प्रवासासाठी दर दिवसाला केवळ पाच रुपयांत मासिक पास देण्यात आले होते. ज्यांना लाख रुपये मासिक पगार मिळतो, अशा शासकीय अधिकारीवर्गाला ही सवलत देण्यात आल्यामुळे अनेकदा ३५ रुपये दर भरणाऱ्या प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागत होते. परंतु, या शासकीय अधिकारी वर्गाला नागरिकांच्या तक्रारीवरून या सुविधेपासून बंद करण्यात आले आहे. ज्या ज्या शासकीय कर्मचाऱ्यांना इथे शासकीय खोल्या उपलब्ध आहेत, अशी मंडळीसुद्धा नेरळ अथवा कर्जत याठिकाणी राहून ई-रिक्षाच्या साहाय्याने नोकरीसाठी येतात. तर येथील निमशासकीय कर्मचारीसुद्धा आपल्या स्वतःच्या खोल्या असताना माथेरान परिसरात वास्तव्यास आहेत. काही दिवसांनी जवळपास वीस नवीन ई-रिक्षांची सेवा उपलब्ध होणार आहे, अशी चर्चा आहे. यासाठी आरटीओने या ई-रिक्षाचे परवडणारे दर निश्चित केल्यास सर्वांना सोयीस्कर होऊ शकते, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

निधी खर्च करण्यात रायगडची हॅट्ट्रिक

याद्या आणि त्यांना निर्धारित वेळेत प्रशासकीय मान्यता मिळून देण्यात नियोजन समितीला यश आले आहे. त्यामुळे शंभर टक्के निधी खर्च करण्यात तिसऱ्यांदा रायगड जिल्ह्याला यश आले आहे, अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे यांनी 'कृषीवल'शी बोलताना दिली.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक मंजुषा सुपडू बागुल उर्फ मंजुषा कुलदिपसिंग गांगुर्डे इतर ३ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे कुशिवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रु.पै.)
४०/१/अ	०-२७-२० हे आर पॉ एवढे क्षेत्र	२-८५

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०१/०४/२०२४
मोबा. ९८२२६९११०९

ॲड. निलेश कान्हु मोरे
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

जाहिर नोटीस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे - कडाव, ता- कर्जत, जि-रायगड येथील मिळकती, त्या मिळकतींचे मालक श्री. जयंत अनंत मसणे यांच्याकडून कायम खरेदीखताने घेण्याचे ठरवले असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

सर्वे.नं.	क्षेत्र	आकार रू. पै.
९७	०.०८.१०	०.१६

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्या दरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास, तसेच कोणत्याही वित्तीय बँक, संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०१/०४/२०२४

वकील
ॲड. सचिन संजय सुर्वे
पत्ता नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक १) सुषमा प्रमोद घरत २) संगिता जितेंद्र घरत यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे चांदई, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर	एकुण क्षेत्र(हे.आर.पॉ.)	आकार (रु.पै.)
८३/१	१-०१-०० हे आर पॉ या जमिन मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी वरील मालक यांचे मालकीचे क्षेत्र ०-३३ ५० हे आर पॉ एवढे क्षेत्र	४-९४
८३/५	०-०४-८० हे आर पॉ	०-०६

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०१/०४/२०२४
मोबा. ९८२२६९११०९

ॲड. निलेश कान्हु मोरे
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पेण, उपविभाग पेण
दुरध्वनी क्र.०२१४३-२५३०३२ ई-मेल:adopen2013@gmail.com

आरटीएस अपील क्र.०१/२०२४
EQJCOURTS नोंदणी क्र.०००००१/२०२४

१. श्री. विकास जनार्दन म्हात्रे .M.No:- ८९८३५०९६६१ अपिलार्थी
रा. वाकण, पो. पाटणसई,
ता. रोहा, जि. रायगड
विरुध्द
१. श्रीम. योजना अरुण पाटील उत्तरार्थी
पूर्वाश्रमीची योजना जनार्दन म्हात्रे
रा. रामवाडी, ता. पेण, जि. रायगड
२. श्री. वैभव जनार्दन म्हात्रे
रा. मुक्ताई नगर पेण, प्रांत ऑफिसच्या मागे,
ता. पेण, जि. रायगड
३. श्रीम. ज्योती प्रशांत कडू
रा. न्यू एअर इंडीया कॉलनी,
सांताक्रूज मुंबई-४०००५५
४. मंडळ अधिकारी वडखळ
ता. पेण, जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/उत्तरार्थी यांना या नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, अपिलार्थी/वादी यांनी मौजे मसदखुर्द, ता. पेण येथील गट क्र. ८६ या मिळकती मधील फेरफार क्र. १४२३ बाबत दिनांक ३१/१०/२०२३ रोजी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम २४७ या न्यायालयात दिनांक ०१/०१/२०२४ रोजी अपील दाखल केला आहे. सदर अपिल मुद्यावर पहिली सुनावणी दिनांक २५/०१/२०२४ रोजी सकाळी ठिक. ११.०० वाजता घेण्यात आली. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आल्या. दिनांक १४/०३/२०२४ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी सामनेवाले क्र. ०३ यांना नोटीस बजावणीसाठी त्याच्या पत्यावर नोटीस पाठविली असता नोटीस बजावणी न झाल्याने सामनेवाले क्र. ३ यांना दैनिक कृषीवल या वृत्तपत्रात बजावणी करणेकामी नोटीस प्रसिद्धी देणेकामी विनंती अर्ज दाखल केला आहे. सामनेवाले/उत्तरार्थी क्र. ३ यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत अपिलकामी पुढील सुनावणी दिनांक ०४/०४/२०२४ रोजी दुपारी ०३-०० वाजता उपविभागीय अधिकारी पेण यांचे कार्यालयात, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ ता. पेण, जि. रायगड येथे निश्चित करण्यात आलेली आहे.

सबब या जाहिर नोटीशीव्दारे सामनेवाले/उत्तरार्थी क्र. ०३ यांना तसेच खालील जमिन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी पेण यांचे न्यायालयात समक्ष हजर राहून आवश्यक त्यासबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. हजर न राहिल्यास उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे योग्य तो निर्णय दिला जाईल याची नोंद घ

नि व ड क

वळके केंद्रांत जनजागृती

कोर्लई : मुरुड तालुक्यातील वळके केंद्रातील प्रत्येक गावात मतदार जनजागृतीसाठी प्रभात फेरी काढण्यात आली. केंद्रातील चोरढे मराठी, चोरडे उर्दू, तळेखार सावरोली वेताळवाडी, शिवगाव, ताडगाव ताडवाडी, सातिर्डे, वळके शिरगाव आमली, संजय नगर चेहेर,वाघुळवाडी या शाळांनी मतदार जनजागृती अभियान राबवले. सर्व विद्यार्थ्यांनी प्रभात फेरीतून विविध घोषणा देत गावातील मतदारांना जागृत केले, तसेच मतदानाचे महत्त्व पटवून दिले.

ग्रामपंचायतीची जप्तीची प्रक्रिया

उरण : ग्रुप ग्रामपंचायत जासई हद्दीतील यार्डधारकांची घरपट्टी वसुली कामे जप्ती प्रक्रिया करण्यात आली. यावेळी आर. के.लॉजिस्टिकस यार्डला टाळे मारून जप्ती करण्यात आली. यावेळी पाच लाख रुपयाचा कर भरला व उर्वरित कर काही दिवसात भरणार असे सांगितले. यावेळी संतोष घरत, माई पाटील, भास्कर पालकर, आदित्य घरत, सुदर्शन पाटील, रामकिशोर ठाकूर, विनायक पाटील, आनंद म्हात्रे, वीणा घरत, सुलोचना घरत, आश्विनी नाईक, हर्षदा तांडेल, श्रुष्टी म्हात्रे, जयश्री घरत, प्रतिक्ष म्हात्रे उपस्थित होते.

मोटार सायकलची चोरी

पनवेल : शहरातील नवनाथ मंदिर जवळील साई छाया बिल्डिंगमध्ये उभी करून ठेवलेली रॉयल इन्फिल्ड कंपनीच्या बुलेट मोटार सायकलची अज्ञात चोरटयांनी चोरी केल्याची घटना घडली आहे.केतन राठोड यांनी त्यांची ६५ हजार रुपये किमतीची ग्रे रंगाची रॉयल इन्फिल्ड कंपनीच्या बुलेट मोटार सायकल क्र एम एच ०५ इ के ८२४६ ही सदर पार्किंगमध्ये उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

मक्याच्या कणसाची चोरी

पनवेल : तालुक्यातील एका फॉर्म हाऊसमधून मक्याचे कणीस काढलेले १६ भारे एका टेम्पोत भरून चोरून नेल्याची घटना घडल्याने या बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. येथील फॉर्म हाऊसमधील शेतातील ३२ हजार रुपये किमतीचे मक्याचे कणीस काढलेले १६ भारे हे एका पांढऱ्या रंगाच्या टेम्पोमध्ये भरून फॉर्म हाऊसमधील शेतातून चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

महामार्गावर वाहनांच्या रांगा

कोलाड : मुंबई-गोवा महामार्गवरील इंदापूर व माणगाव दरम्यानच्या चौपदरी करणाचे काम अजून अपूर्ण स्थितीत असल्यामुळे येथे वाहनांच्या लांबच-लांब रांगा लागत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. चाकरमानींचा परतीचा प्रवास, लागोपाठ आलेल्या सुट्ट्या, सुरु झालेली लग्नसराईमुळे महामार्गावर येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची संख्या वाढली आहे. परंतु, इंदापूर व माणगावमधील बायपास रस्त्याचे काम पंधरा वर्षांपासून अपूर्ण स्थितीत असून या कामात प्रगती दिसत नाही.

मान्यवरांकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन

। भाकरवड । प्रतिनिधी । शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि.२९) निधन झाले. निधनाची वार्ता कळताच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून पेझारी येथे जाऊन पाटील कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली.

यावेळी रविवारी (दि.३१) पेझारी येथे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, माजी खा. रामशेठ ठाकूर, माजी आ. नितीन सरदेसाई, आ. विश्वजीत कदम, माजी आ. अवधूत तटकरे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आर.सी. घरत यांनी आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांची भेट घेत सांत्वन केले. यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, युवा नेते सवाई पाटील, आंबेपूरच्या सरपंच सुमना पाटील आदी पाटील कुटुंबिय व कार्यकर्ते उपस्थित होते.

● (छायाचित्र : जीवन पाटील)

प्रियदर्शनी स्वर्गीय ताई

दिसणार नाही आता, ताई प्रियदर्शनी
अखंडधारा अश्रू वाहती
लाखो लाखो नेत्रांतूनी।
महाराष्ट्राची सेवाव्रतधारी
अबलांना सबला करणारी
पतितांची दुःखे जाणणारी
शिकार झाली निर्दय यमाची,
ती प्रियदर्शनी।
तेजोमय सूर्य कायमचा मावळला
रायगडाचा प्रेमळ आधार निमाला
पोरकेपण लाभले जनमानसाला
तिमिर पसरला चहूकडे,
ताई जाता सोडूनी।
जनसेवेस्तव जीवन अर्पिले
समाज विकासाचे स्वप्न अधुरे राहिले
गोड आठवणी ताईच्या त्या,
विसरेल का कधी कुणी?
जीवन सारे केले सार्थक,
उच्चपदे भुषवूनी
षड्रिपूंना दूर ठेविले, व्रतधारी बनूनी
श्रद्धांजली प्रिय ताईला
शब्दफुले अर्पूनी ।।

- अनंत केशव देवघरकर
अलिबाग

आठवडी बाजार बंद करण्याची मागणी

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ शहरात भरवण्यात येत असलेला बुधवार आठवडी बाजार कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी नेरळ व्यापारी वर्गाकडून करण्यात आली. यासाठी नेरळ ग्रामपंचायत सरपंच तसेच नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी यांच्याकडे निवेदन व्यापारी वर्गाकडून देण्यात आले आहे. बुधवार आठवडी बाजारात चोरीचे प्रमाण वाढले असून महिलांचा सुरक्षतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच परप्रांतीय हातगाड्याधारकांमुळे वाहतूक कोंडी, व्यापाऱ्यांनाच अरेरावेची भाषेमुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने हा बाजार बंद व्हावा ही मागणी पुढे आली आहे.

नेरळ शहरात भर रस्त्यावर अनेक वर्षांपासून दर बुधवारी सकाळपासून आठवडा बाजार भरतो. मात्र, या बाजारात परप्रांतीय विक्रेते भाजी, खाद्यपदार्थ सोडून वेगवेगळ्या वस्तू विक्रीसाठी ठेवतात. यामुळे येथील फूटपाथ आणि रस्ता या बाजारामुळेव्यापून जातो. या आठवडा बाजारामुळे अरुंद रस्ता आणखीनच अरुंद होत चालला असून येथे चालणे देखील कठीण होत चालले आहे. शिवाय या गर्दीचा येथील नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतो. बाजारात होणाऱ्या गर्दीचा फायदा घेऊन चोरीचे प्रकारदेखील घडतात. यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षेची भावना निर्माण झाली आहे. मंगळसूत्र चोरी, पाकीटचोरी असे प्रकार अनेक वेळा या बाजारात घडले आहेत.

त्यामुळे येथील व्यापारी वर्गाने नेरळ ग्रामपंचायत सरपंच उषा पारधी तर नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांची भेट घेत नेरळ बुधवारचा आठवडी बाजार कायमस्वरूपी बंद करावा अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. यावेळी नेरळ व यापारीफेडरेशनचे अध्यक्ष मनोहर अहिरे, प्रीतम गोरी, विशाल साळुंके, जैद नजे, रवी कटारिया, रवी जैन, पंढरी हजारे, संजू जैन यासंह अनेक व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विदेशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्याला अटक

। पनवेल । वार्ताहर ।

विदेशी बनावटीचे पिस्टल बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगाराला मानपाडा पोलीस ठाणे, डोंबिवली यांनी केली अटक करून सुमारे दोन लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मानपाडा पोलीस ठाण्यांचे हददीत टाटा नाका परिसर येथे एक इसम बेकायरेदशीर विनापरवाना पिस्टल सोबत बाळगुन फिरत असल्याबाबत माहिती मिळाल्याने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या वेगवेगळया टिम तयार करण्यांत येऊन गुन्हयांतील आरोपीतास पकडण्याकरीता सापळा लावण्यात आला. गुप्त बातमीदार नुसार आरोपीताचा शोध घेऊन राम उर्फ शिवा फुलचंद कनोजीया यास गुन्हे प्रकटीकरण पथकाने शिताफीने ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक विदेशी बनावटीचे पिस्टल व दोन जिवंत काडतुस

असा एकुण २,००,४०० रू. किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला. सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, सचिन गुंजाळ, सुनिल कुराडे, यांचे मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने, राम चोपडे, दत्तात्रय गुंड, संपत फडोळ, महेश राळेभात, प्रशांत आंधळे, भानुदास काटकर, राजकुमार खिलारे, शिरीष पाटील, सुनिल पवार, संजु मासाळ, विकास माळी, दिपक गडगे, गणेश भोईर, प्रविण किनरे, यल्लापा पाटील, देवा पवार, यांच्या पथकाने केली.

कोप्रोली आरोग्य केंद्रात औषधांची वानवा

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा वानवा पाहायला मिळत आहे. यामुळे गोरगरीब रुग्णांचे हाल होत असून, रुग्णांना मेडिकलमधून औषधे विकत घ्यावी लागत आहे. त्यामुळे येथील गोरगरीब गरीब जनता त्रस्त झाली आहे.

गोरगरीब रुग्णांना आरोग्य सेवा व्यवस्थित मिळाव्यात व नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे म्हणून शासनाने जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू केली आहेत. गोरगरिबांना कोणत्याही प्रकारे त्रासाला सामोरे जावे लागू नये, व त्यांच्यावर व्यवस्थित उपचार व्हावा म्हणून आरोग्य विभागाकडून ४०० पेक्षा अधिक प्रकारच्या गोळ्या-औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरवला जातो. मात्र, तालुक्यातील कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेक प्रकारच्या गोळ्या-औषधे उपलब्ध नसल्याने काही ठराविक गोळ्या-औषधांचा वापर रुग्णांसाठी होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून या प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधांचा बोजवारा पाहायला मिळत आहे एकतर डॉक्टरांची कमी त्यात औषधांचा तुटवडा यामुळे परिसरातील गोरगरीब जनता त्रस्त झाली आहे. सध्या औषध उपलब्ध नाहीत नंतर येतील त्यामुळे बाहेरून औषधे विकत घ्या असे कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रात रूग्णांना येथील आरोग्य केंद्रातील कर्मचारी सांगत आहेत. त्यामुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांचे हाल होत आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्रात सुरू असणाऱ्या भोंगळ कारभारामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या रूग्णांचा जीव टांगणीला लागला असून प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था रोज मेरे त्याला कोण रडे अशी झाली असेल तर गोरं गरीबांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या सदर रुग्णालयाच्या कारभाराची चौकशी करण्यात यावी अशी मागणी सत्यवान भगत यांनी केली

> **आमच्याकडून औषध पुरवठा व्यवस्थित केला गेला आहे. जर तशी काही परिस्थिती असेल तर त्याची माहिती घेऊन चौकशी करण्यात येईल.**
>
> **– डॉ मनीषा विखे**
> **कम्युनिटी मेडिसिन जिल्हा आरोग्य अधिकारी**

उन्हाळ्यामुळे अकराच्या आत घरात

। पनवेल । वार्ताहर ।

उन्हाचा ताप वाढल्यामुळे 'सकाळी अकराच्या आत घरात' अशी स्थिती ग्रामीण भागात आहे. दुपारच्या सत्रात घरात विश्रांती घेणे नागरिकांनी पसंत केले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा सकाळच्या सत्रात सुरू आहेत. घरोघरी रात्रंदिवस पंख्यांची घरघर सुरू झाली आहे. नाक्या-नाक्यावर रसवंती गृहांच्या घुंगरांची खुळखुळ कानावर पडत आहे. उसाचा रस, लस्सी, ताक, लिंबू सरबत यांची मागणी वाढली आहे. आइस्क्रीम आणि बर्फाचा गोळा विकणारे फिरू लागले आहेत. जनावरांसह माणसेदेखील गारव्याच्या शोधात झाडाच्या सावलीला विसावत आहेत.

उन्हाळी वाळवण पदार्थ तयार करण्यासाठी महिलांची धावपळ सुरू केली आहे. उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने शहरातील मुख्य बाजारपेठेसह वसाहतीमधून सर्वच रस्त्यांवर दुपारी शुकशुकाट पसरू लागला आहे. नागरिकांनी दैनंदिन कामाच्या वेळापत्रकात बदल केल्याने बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल मंदावली आहे. सकाळी आठ वाजल्यापासूनच उन्हाचा चटका जाणवत असून कमाल तापमान ३६-३८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले आहे. त्यामुळे सकाळच्या सत्रात आपली कामे आटोपण्यावर बहुतांश नागरिकांचा भर आहे.

मुख्य पेठेसह बसस्थानक परिसर, मिर्ची गल्ली, लाईन आळी, शिवाजी चौक, टिळक रोड या रस्त्यांवर पूर्ण शुकशुकाट पसरत आहे. या ठिकाणचे सर्व रस्ते ओस पडल्याचे चित्र दुपारच्या वेळेत पाहायला मिळत आहे. शासकीय कामासाठी येणाऱ्या नागरिकांची वर्दळ कमालीची कमी झाली आहे. शासकीय कार्यालये दुपारी सामसूम असतात.

मारहाणप्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव तालुक्यातील एचडीएफसी बँक शाखा मोर्बा येथील गार्डला मारहाण केल्या प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना दि. २८ मार्च २०२४ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास मोर्बा येथे घडली होती. याबाबतची फिर्याद शुभम नागेश दाभेकर (वय-२४) रा. कुमशेत यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

सदर घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील आरोपी गणेश तुकाराम पवार (वय-२७) रा. शिरवली आदिवासीवाडी याने शुभम दाभेकर हा सेवेत असताना आरोपी गणेश पवार हा दारू पिऊन येऊन त्या ठिकाणी झोपला होता. याबाबत गार्डने बँक मॅनेजर सतपाळसिंग जावरा याना आरोपी याचे नाव सांगितले. या गोष्टीचा मनात राग धरून आरोपी याने फिर्यादी याना शिवीगाळ, दमदाटी करून हाताबुक्याने मारहाण करून डोक्यात दुखापत केली. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली. सदर घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत भोजकर हे करीत आहेत.

पालीकरांवर पाण्याचे संकट

- **नगरपंचायतीचे दहा लाख ३० हजार वीज बिल थकित**
- **वीज महावितरणने पंप हाऊसचा वीजपुरवठा केला खंडित**

। पाली/बेणसे । वार्ताहर । **पालीकरांना पाणीटंचाईच्या संकटांने ग्रासले आहे. ऐन उन्हाळ्यात पाण्याची आणी बाणी आली आहे. एकीकडे आंबा नदीची पाणी पातळी प्रचंड घटली आहे. तसेच जॅकवेल मधील गाळ काढण्यासाठी दि. २६ व दि. २७ पालीतील पाणीपुरवठा बंद करण्यात आला. त्यातच गुरुवारी (दि.२८) वीज महावितरणने नगरपंचायतचे तब्बल १० लाख ३० हजार रुपये वीज बिल थकीत असल्यामुळे मोटर पंप हाऊसचा वीजपुरवठा खंडित केला. त्यामुळे तिसऱ्या दिवशी पालीकरांवर पाणीटंचाईचे संकट ओढावले.**

नगरपंचायतने फेब्रुवारीमध्ये पाणीपुरवठा मोटर पंप हाऊसचे विजबिल या महिन्यात भरले. पण या महिन्याचे (मार्च) पंप हाऊसचे तब्बल चार ते साडेचार लाखांचे वीजबिल अजूनही भरलेले नाही. याशिवाय स्ट्रीट लाईट व इतर वीज बिल मागील व चालू महिन्याचे भरलेले नाही मागील महिन्याचे व चालू महिन्याचे मोटर पंप व स्ट्रीट लाईट आणि इतर विज बिल मिळून एकूण १० लाख ३० हजार रुपयांचे विज बिल थकीत आहे. वीज महावितरण बिल भरण्यासाठी अवधी देऊन देखील वीज बिल भरण्यात आले नाही.

परिणामी नाईलाजाने वीज महावितरण ने येथील वीजपुरवठा खंडित केला आहे. आणि याचा फटका पालीकरांना बसला आहे. ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर अघोषित पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. ज्यांच्याजवळ कुठेही विहीर किंवा बोअरवेल नाही त्यांना लांबून पाणी आणावे लागत आहे.

> **जॅकवेलमधील गाळ काढण्यासाठी पाणीपुरवठा बंद करण्यात आला. आजही गाळ काढण्याचे काम सुरू होते, त्यामुळे पाणीपुरवठा बंद होता. थकीत वीज बिल भरण्यात येईल.**
>
> **–विद्या येरूनकर,**
> **मुख्याधिकारी, पाली**

> **मागील व या महिन्याचे मोटर पंप व स्ट्रीट लाईट व इतर मिळून एकूण १० लाख ३० हजार रुपयांचे वीज बिल थकीत आहे. नगरपंचायतीला दोन ते तीन वेळा वीज भरण्याच्या सूचना व अवधी दिला मात्र त्यानंतरही त्यांनी वीज बिल भरले नाही. त्यामुळे पंप हाऊसचा वीजपुरवठा खंडित केला.**
>
> **– उमाकांत सपकाळे, उपकार्यकारी अभियंता, वीज महावितरण, पाली**

रंगीत नसलेले चित्र

सर्व कसे छान सुखात चालू आहे, सगळेजण कसे आनंदाने न्हाऊन निघालेले आहेत असे चित्र रंगवायला भांडवलदारी कंपन्यांना नेहमी आवडते. त्यांचे कपडे, मोबाईल फोन्स, मोटारगाड्या, शहरांमधील महागडे फ्लॅट्स सतत आणि अधिकाधिक संख्येने विकले जाणे आवश्यक असते. त्यामुळे मिडियामधून सतत चांगले चालू असल्याच्या बातम्या याव्यात असा त्यांचा प्रयत्न असतो. मुंबईतील एका मोठ्या इंग्रजी दैनिकाने मध्यंतरी कोणाच्याही निधनाच्या किंवा भयंकर अपघाताच्या बातम्या पहिल्या पानावर छापण्याचे याच कारणास्तव बंद केले होते. पण काही दिवसांनी तो निर्णय मागे घ्यावा लागला होता. तरीही कंपन्यांचे प्रयत्न चालू असतातच. त्यातच आता त्यांना मोबाईल फोन नावाच्या एका भानामतीचा शोध लागला आहे. देशातील बहुसंख्य जनतेला या भानामतीची लागण झाली आहे. ही जनता आता आपली रोजच्या आयुष्यातील सर्व दुःखे विसरू लागली आहे. फोन्सवर नाच, गाणी, फालतू जोक्स, रील्स यांचा अखंड पुरवठा सुरू असला की तिचे भागते. घरातली आजारपणे, महागाई, बेकारी अशा चिंता त्यांना सतावेनाशा होतात. त्यातच आता निवडणुकांचा हंगाम आला आहे. सर्वत्र कशी प्रचंड समृध्दी आहे, देश किती झपाट्याने विकास करतो आहे याची सुखचित्रे रंगवणे ही सत्तारुढ भाजपची गरज आहे. त्यांच्याकडे कोणतेही चित्र रंगीत करून देणारी सोशल मिडियाची फौज बसलेली आहे. त्यांना गोठ्यात बांधलेल्या टीव्ही वाहिन्यांची साथ आहे. त्यामुळे या देशातले सर्व प्रश्न सुटले आहेत किंवा पुन्हा मोदींना निवडून दिले तरच सुटणार आहेत असा जोरदार प्रचार चालू आहे. या सर्वांमध्ये गरीब व दुर्बल जनतेला कोणताही आधार वा आवाज नाही. तिला भेडसावणाऱ्या समस्यांवर पडदा टाकून त्या कोणालाही दिसू नयेत याचे प्रयत्न या जनतेच्या देखतच चालू आहेत. मागे ट्रम्प अहमदाबादेत आले होते तेव्हा तेथील झोपड्या दिसू नयेत म्हणून त्यांच्या समोर मोठी भिंतच उभारण्यात आली होती. तसा प्रकार आता देशभर चालू आहे.

टंचाईची गंभीर स्थिती

याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे राज्य व देशातील दुष्काळाच्या स्थितीचे. गेल्या वर्षी सर्व देशभरच अत्यंत कमी पाऊस पडला. विशेषतः दक्षिण भारत, महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, ओरिसा इत्यादी राज्यांना कमी पावसाचा चांगलाच फटका बसला. महाराष्ट्रात सर्वत्र पाण्याची पातळी खाली गेली असून फेब्रुवारीपासूनच अनेक भागात टंचाई जाणवू लागली आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार राज्यातील सुमारे तीन हजार धरणांमध्ये केवळ चाळीस टक्के साठा उपलब्ध आहे. पण ही सरासरी झाली. मराठवाड्यातील धरणांमध्ये केवळ वीस टक्केच पाणी शिल्लक राहिले आहे. पुणे विभागातील धरणांमध्ये गेल्या वर्षी मार्चमध्ये सत्तर टक्के साठा होता. यंदा तो केवळ चाळीस टक्के उरला आहे. कोयना, कृष्णा या नद्या यंदा ऐन पावसाळ्यातच रोडावल्या होत्या. मोठ्या शहरांमध्ये स्थिती ठीक राहील. पण गावे व वाड्या, विशेषतः माणदेशाचा दुष्काळी भाग, यांची अवस्था कठीण होईल. उजनी धरणाची पातळी झपाट्याने खाली चालली आहे. सोलापूर महापालिका, करमाळा, बार्शी, कुर्डुवाडी, इंदापूर, बारामती, धाराशिव, जामखेड ही शहरे, अनेक औद्योगिक वसाहती आणि शंभरेक ग्रामपंचायतींचा पाणीपुरवठा उजनीवर अवलंबून आहे. पण धरणात सध्या उणे सदतीस टक्के पाणी आहे. ते आणखी खाली गेल्यास सोलापूरला आठ-दहा दिवसांतून एकदा तर बाकीच्यांना त्याहूनही कमी पाणी मिळेल. मराठवाड्यामध्ये इतरत्र तर अधिक भयंकर परिस्थिती आहे. या भागाचे उदाहरण मुद्दाम यासाठी दिले की, निवडणुकीच्या फडाच्या सर्वात रंगीत-संगीत बातम्या याच प्रदेशातून येत आहेत. प्रचंड मोठी टंचाई समोर आहे आणि अजूनही दोन महिने जायचे आहेत. तरीही जनतेचा आणि माध्यमांना राजकारणाच्या गावगप्पा करण्यातच अधिक रस आहे. राज्य किंवा केंद्र सरकारला ही अगदी हवी तशी स्थिती आहे. पाण्यासाठी कोठेही आंदोलने नाहीत, अमुक उमेदवार हवा किंवा तमुक नको म्हणून मात्र लोक रस्त्यावर येत आहेत.

आडातच नाही तर...

गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यातील स्थिती चांगली होती. कारण, आदल्या वर्षी महामूर पाऊस झाला होता. गेल्या वर्षीच्या मार्चमध्ये केवळ एकवीस गावांमध्ये टँकर चालू होते. यंदा मात्र तीन हजार गावांमध्ये सुमारे एक हजार टँकरने पाणी द्यावे लागत आहे. म्हणजे टंचाईग्रस्त गावांची संख्या दीडशे पटींनी वाढली आहे. इथून पुढच्या काळात ही संख्या झपाट्याने वाढणार आहे. याच दरम्यान लग्नसराई, गावांच्या जत्रा इत्यादी असतात. यंदा त्यात निवडणुकांच्या सभा आणि बैठका यांची भर पडणार आहे. एकूण या सर्वांचा पाणीपुरवठ्यावर ताण पडणार आहे. पुणे जिल्ह्यात ३४ तर सातारा जिल्ह्यात १३२ गावांमध्ये टँकर चालू आहे. पण लोक मात्र अजूनही दादा, ताई, वहिनी, राजे, राव, भाऊ यांच्या गमतीजमती चघळण्यातच मग्न आहेत. कोकण, नाशिक व अमरावती या विभागात तुलनेने बरी स्थिती असली तरी तेथेही टँकरने पाणीपुरवठा सुरू झालेला आहेच. रायगड जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे दुर्गम वाड्या आणि सह्याद्रीलगतचा परिसर यामध्ये टंचाईचे चटके जाणवू लागलेले आहेत. कालपर्यंत सर्व राज्यभरातली शासकीय यंत्रणा ३१ मार्चचे हिशेब पूर्ण करण्याच्या गडबडीत होती. आता इथून पुढे निवडणुकीची धांदल सुरू होईल. आचारसंहिता लागू असल्याने राजकीय कार्यकर्त्यांवर बंधने येतील व सरकारी मंडळींना अधिक अधिकार प्राप्त होतील. ही मंडळी आपले काम करीत आहेत की नाही यावर आता बारकाईने लक्ष ठेवावे लागणार आहे. मोबाईलमध्ये दिसणाऱ्या दुनियेसारखे हे चित्र रंगीत नसणार आहे. तरीही जनतेला त्याकडे पाहावे लागणार आहे. हर घर जल अशी मोदींची योजना आहे. त्यानुसार कदाचित काही भागात नळ टाकले जाऊन त्या त्या कंत्राटदारांची चांदी झाली असेल. त्यामुळे नळ पाईपरुपी पोहऱ्यांपेक्षाही मुळात आडांमध्ये पाणी असेल हे पाहण्याची अधिक गरज आहे, हे जनतेला यंदा बहुदा कळावे व तिने ते सत्ताधाऱ्यांना मतदानातून कळवावे अशी अपेक्षा आहे.

विचार

लडाखची लढाई

लडाखमधील निरामय शांतता गेल्या काही दिवसांपासून भंग पावली आहे. लडाखचे सुमारे तीस हजार अस्वस्थ नागरिक अलिकडेच कडाक्याच्या थंडीतही रस्त्यांवर उतरले होते. लेह ॲपेक्स बॉडी आणि कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स' संयुक्तपणे हे आंदोलन करत आहे. लडाखला राज्याचा दर्जा, सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश, नोकरीत आरक्षण, लडाखसाठी स्वतंत्र लोकसेवा आयोग आणि लेह-कारगिलसाठी संसदीय जागा या त्यांच्या मागण्या आहेत.

बर्फाच्छादित पर्वत आणि सुंदर तलावांनी नटलेले लडाख मुळातच शांतिप्रिय आहे. लेह, लडाख आणि कारगिल हे इथले मुख्य भाग. साधेसुधे, आपल्या परंपरा जपणारे आणि आदिवासी संस्कृती सांभाळणारे इथले नागरिकही तसेच शांतताप्रिय आहेत. पर्यटकांना मोह घालणाऱ्या लडाखला भेट देणाऱ्यांची संख्या कायमच वाढती राहिली आहे. परंतु सर्वत्र प्रतिध्वनित होणारी ही निरामय शांतता गेल्या काही दिवसांपासून भंग पावली आहे. अस्वस्थतेच्या आगीत होरपळणारे लडाखचे नागरिक आता रस्त्यावर उतरले आहेत. अलिकडेच कडाक्याच्या थंडीतही सुमारे तीस हजार नागरिक लेह आणि कारगिलच्या रस्त्यांवर उतरले होते. अर्थात त्याला कारणही तसेच होते. खरे तर त्यांच्या मागण्या अगदी साध्या पण अत्यावश्यक आहेत. 'लेह ॲपेक्स बॉडी आणि कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स' संयुक्तपणे हे आंदोलन करत आहेत. त्यांनी सहा सुत्री अजेंडा मांडला आहे. लडाखला राज्याचा दर्जा, राज्यघटनेतल्या सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश, नोकरीत आरक्षण, लडाखसाठी स्वतंत्र लोकसेवा आयोग आणि लेह आणि कारगिलसाठी संसदीय जागा या त्यांच्या प्रमुख सहा मागण्या आहेत.

केंद्रशासित प्रदेश हा लडाखचा दर्जा काढून पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात यावा, अशी त्यांची पहिली मागणी आहे. आंदोलकांनी उचलून धरलेल्या या प्रश्नाची सुरुवात झाली ती भाजप सरकारने कलम ३७० काढून टाकल्यानंतर. २०१९ मध्ये पूर्वीचे जम्मू-काश्मीर दोन भागांमध्ये विभागले गेले. जम्मू-काश्मीरबरोबरच लडाखलाही केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा प्राप्त झाला. याला एव्हाना तीन वर्षे झाली आहेत. राजकीय अस्थैर्य म्हणून जम्मू-काश्मिरमध्ये निवडणुका घेतल्या जात नाहीत. पण राजकीय स्थैर्य असूनही लेह-लडाख-कारगिलमध्ये अद्याप निवडणुका झालेल्या नाहीत. जम्मू-काश्मीरपासून मुक्त झाल्याचा सुरुवातीचा उत्साह २०२१ पासून मावळू लागला आणि केंद्रशासित प्रदेश असल्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी आणि प्रश्न जाणवू लागले. रोजगारनिर्मिती, गुंतवणूक, आर्थिक स्वायत्तता, स्थानिकांचा संपत्तीचा विशेषाधिकार यासारख्या मुद्यांवर केंद्राने या प्रदेशाला अनेक आश्वासने दिली होती. परंतु त्यातले एकही आश्वासन अद्याप पाळले गेलेले नाही.

मेधा इनामदार

लेह आणि कारगिलला संसदेत स्वतंत्र जागा द्याव्यात अशीही यांची मागणी आहे. आंदोलकांच्या म्हणण्याप्रमाणे पूर्ण राज्याचा दर्जा मिळाल्यानंतरच लोक त्यांच्या राज्यासाठी प्रतिनिधी निवडू शकतात. सध्या या प्रदेशातून फक्त एकच लोकप्रतिनिधी संसदेत जातो. या प्रदेशाचा आवाज संसदेत मांडण्यासाठी त्यात आणखी एकाची भर हवी ही या प्रांतातील नागरिकांची आणखी एक मागणी आहे. खरे तर सप्टेंबर २०१९ मध्येच 'राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगा'ने लडाखच्या केंद्रशासीत प्रदेशाचा समावेश 'सहाव्या परिशिष्टात करण्याची शिफारस केली होती. घटनेनुसार सहाव्या अनुसूचीत समावेश झाल्यानंतर स्थावर मालमत्तेचा आणि स्वायत्ततेचा हक्क घटनेनुसार दिला जातो. ही बाब स्थानिकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरते. एकट्या लडाखमध्ये ९७ टक्के नागरिक 'अनुसूचित जमाती'मध्ये मोडतात. त्यामुळे सहाव्या अनुसूचीत समाविष्ट असलेल्या आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोरामच्या आदिवासी भागात लागू असलेले नियम लडाखमध्येही लागू व्हावेत, अशी इथल्या स्थानिकांची मागणी आहे.

सहाव्या अनुसूचीअंतर्गत आणखी एक महत्वाची तरतूद घटनेने केली आहे. एका जिल्ह्यात वेगवेगळ्या जमाती असतील तर अनेक स्वायत्त जिल्हे निर्माण होऊ शकतात. आदिवासी भागात स्वायत्त जिल्हे निर्माण करण्याच्या तरतुदीमुळे या जिल्ह्यांना राज्यात वैधानिक, न्यायिक आणि प्रशासकीय स्वायत्तता प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येक स्वायत्त जिल्ह्यात एक स्वायत्त जिल्हा परिषद निर्माण करता येते. जमीन, जंगल, पाणी, शेती, ग्राम परिषद आरोग्य, स्वच्छता, गाव आणि शहर पातळीवरील पोलिस खातेविषयक कामे, वारसा, विवाह आणि घटस्फोट, सामाजिक चालीरीती आणि खाणकाम संबंधित कायदे आणि नियम बनवण्याचा अधिकार या तरतुदीअंतर्गत राज्याला दिला जातो. म्हणून लेह- लडाख- कारगिल या परिसराला स्वतंत्र राज्याचा दर्जा हवा आहे आणि तो लगेच देता येत नसेल तर केंद्रशासित प्रदेशात स्वतःची प्रतिनिधी सभा हवी, अशी या आंदोलकांची मागणी आहे. या राजकीय मागण्यांबरोबरच 'थ्री इडियट्स' या हिंदी चित्रपटामुळे प्रकाशझोतात आलेले शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी नुकत्याच शेअर केलेल्या एका व्हिडीओमुळे खळबळ उडाली आहे. 'सर्व काही ठीक नाहीये, असे त्यांनी या व्हिडीओत म्हटले आहे.

लडाखच्या पर्यावरणाबद्दलची चिंता त्यांनी या व्हिडिओमध्ये प्रकट केली आहे. हा व्हिडिओ अत्यंत वेगाने व्हायरल झाला आणि वांगचूक यांना प्रचंड पाठिंबा मिळाला. लडाखला राज्याचा दर्जा देण्याची मागणी करणाऱ्या घोषणा जंतरमंतर येथे देण्यात आल्या. लेह सर्वोच्च संस्था आणि कारगिल लोकशाही आघाडीने राष्ट्रीय राजधानीत संयुक्त निषेध केला. तसेच लडाखमधील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संघटनांचे प्रतिनिधी तसेच शेकडो सामान्य लडाखी एकत्र आले आणि संसद भवनापासून वेधशाळेपर्यंत दगडफेक करत त्यांनी त्यांचा आवाज सरकारपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला. नुकतेच पुण्यातही वेताळ टेकडीवर अनेक पर्यावरणप्रेमींनी एकत्र येऊन आंदोलन सुरू केले आहे. लडाख प्रदेशात वेगाने वितळणाऱ्या ग्लेशिअरमुळे येथील नागरिकांना उणे तापमानातील थंडीचा सामना करावा लागत आहे. येथील हिमनद्यांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र सरकारने तातडीने पावले उचलावीत आणि हिम नद्यांच्या गंभीर समस्येवर सकारात्मक मार्ग काढायला हवा. अन्यथा, लडाखमधील दोन तृतियांश हिमनद्या नष्ट होतील, अशी मागणी वांगचूक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली.

लडाखला बाहेरील लोकांपासूनच नव्हे, तर लडाखी लोकांपासूनही वाचवण्यासाठी या अनुसूचीची आणि स्वतंत्र राज्याचा अधिकार मिळण्याची गरज आहे, असेही वांगचूक यांनी सरकारला बजावले आहे. ते पुढे सांगतात, 'लडाख हे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र आहे. नवे उद्योगधंदे आणताना किंवा कोणतेही विकास कार्यक्रम राबवताना सहाव्या अनुसूचीनुसार स्थानिक लोकांशी सल्लामसलत आवश्यक असते. तसे न घडल्यास कधी समजून उमजून तर कधी नकळत आपण स्वतःच इथल्या सुंदर निसर्गाच्या आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरू शकतो. या राज्याशी संबंधित निर्णय घेताना स्थानिकांचे मत विचारात घेऊन कोणत्या प्रकारचे उद्योग उभारायचे ते ठरवायला हवे. आज आमच्या परंपरा, जातीय अस्मिता, संसाधने आणि सुरक्षा धोक्यात आली आहे. लडाखला राज्याचा दर्जा देऊन आम्हाला लोकशाहीची पुनर्स्थापना करायची आहे, असे भाजपचे माजी खासदार थुप्स्टन छेवांग म्हणाले. छेवांग यांनी २०१८ मध्ये आपल्या पक्षाने लडाखच्या लोकांना दिलेली आश्वासने पूर्ण न केल्याचा आरोप करून राजीनामा दिला होता.

या प्रदेशासाठी नुकताच एक मोठा सौर ऊर्जा प्रकल्प नियोजित करण्यात आला आहे, परंतु पश्मीना उत्पादनासाठी ओळखल्या जाणाऱ्या भटक्या विमुक्तांचे क्षेत्र या प्रकल्पामुळे विस्थापित होणार आहे. त्यांची समृद्ध कुरणे नाहीशी होणार आहेत. इथल्या पर्यावरणावरही त्याचा परिणाम होणार आहे, असं छेवांग यांनी स्पष्ट केले आहे. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्र सरकारने लेह अपेक्स बॉडी आणि कारगिल लोकशाही आघाडीच्या प्रतिनिधींसोबत चर्चा केली आहे. अलीकडेच केंद्राने दुसऱ्या फेरीच्या चर्चेची घोषणाही केली. लडाखच्या लोकांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी केंद्राने गृहव्यवहार राज्यमंत्री नित्यानंद राय यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समितीही स्थापन केली आहे. आश्चर्य म्हणजे अगदी लहान सहान घटनांना महत्व देऊन संपूर्ण दिवस त्याच त्या बातम्या देणाऱ्या असंख्य न्यूज चॅनल्सनी आणि प्रसारमाध्यमांनी मात्र या अत्यंत महत्वाच्या विषयाकडे चांगलेच दुर्लक्ष केले. त्यामुळे हे सारे लोकांसमोर यायला बराच काळ जावा लागला. लडडाखसमोरील प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे काम केंद्र सरकार, आंदोलक, स्थानिक नेते आणि वांगचूक यांच्यासारखे सामाजिक कार्यकर्ते आपापल्या परीने करत आहेत आणि करतीलही. परंतु या निमित्ताने राजकारण, समाजकारण आणि माध्यमे यांच्यातला विसंवाद चव्हाट्यावर आला, हे मात्र नक्की.

आजकाल

मोदींची मुलाखत आणि केजरीवाल अटक

तुषार गायकवाड

गोदी मेडीया मुख्य बातम्या देत नाही म्हणून सत्ताधाऱ्यांचे वैचारिक विरोधक असलेले सोशल मेडीया नेटीझन्स विविध महत्वाच्या घटनांवर व्यक्त होतात. त्या घटनेमागील मर्म समजून सांगतात. सत्तेच्या कित्येक लबाड्यांची चीरफाड करतात.

सत्य लोकांपर्यंत पोहोचवतात. पत्रकार नसतानाही पत्रकाराची कामगिरी बजावतात. याचमुळे सोशल मेडीया हा गोदी मेडीया पेक्षा अधिक प्रभावी मानला जातो. हे सगळं एका बाजूला असले तरीही यावरही सत्ताधाऱ्यांनी मुख्य बातमीवर सोशल मेडीयात चर्चाच न होण्यासाठी एक आगळाच रामबाण उपाय काढला. तो म्हणजे सतत प्रधान प्रचारकांचे ईव्हेंट कॅमेरे घेऊन करायचे. त्या ईव्हेंट दरम्यान जाणीवपूर्वक प्रधान प्रचारक ट्रोल होतील अशी वेशभूषा करतात. जाणीवपूर्वक कॅमेऱ्याच्या मध्ये येणाऱ्यास हाकलले जाते. त्याचे व्हिडिओ व्हायरल होतात. किंवा मग प्रधान प्रचारक आवडत्या 'चरणचाटू'स मुलाखत देतात.या मुलाखतीत जाणीवपूर्वक प्रधान प्रचारक ट्रोल होतील अशी भंपक विधाने स्क्रिप्ट मध्ये घातलेली असतात. त्या विधानांचे व्हिडिओ मुद्दाम कोलीत म्हणून दिले जातात. मग हुशार, विद्वान व जबाबदार नागरीक असलेले विरोधी नेटीझन्स असले फोटो आणि व्हिडीओ एक-दोन दिवस सलग आपल्या वॉलवर सजवून वेगवेगळ्या कॅप्शनसह त्यावर चर्चा करत राहतात.याचा परिणाम प्रधान प्रचारकांची टिंगल होण्याऐवजी त्यांना नकारात्मक प्रसिध्दी मिळते. 'बदनाम हुआ तो क्या हुआ? नाम तो हुआ' या उक्तीप्रमाणे मुद्दाम ट्रोल होवून मुख्य बातमी दडपली जाते. सत्य दडपणे फॅसिस्टांचा सत्तेवर राहण्यासाठी महत्वाचा निकष असतो.

आज फेसबुक उघडल्यापासून प्रधान प्रचारकांनी बिल गेट्स यांच्या सोबतच्या गप्पांत वर केलेला बालीशपणा प्रधान प्रचारकांच्या विरोधकांनी वेगवेगळ्या पध्दतीने आपल्या वॉलवर सजवल्याचे दिसले. त्यावर लाईक्स मिळत आहेत. मात्र त्यामुळे मतदारांना विचार करायला लावणाऱ्या २ मुख्य बातम्या दडपल्या आहेत.बातमी क्रमांक १) अटकेत असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी न्यायालयात न्यायमूर्तींना स्पष्टपणे विचारले की, माझ्या विरोधात कोणताही पुरावा नाही. फक्त एक व्यक्ती आरोप करतोय म्हणून मला बेकायदेशीर अटक केली आहे. अशाच आरोपांवर अटक केली जाणार असेल? तर 'पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना मी (केजरीवाल) १०० कोटी रुपये दिले असा आरोप केला तर अटक कराल का?'

केजरीवाल यांच्या या युक्तिवादावर न्यायमूर्तीही निरुत्तर झाले होते. मुळात ज्या शरथ रेड्डी याने सरकारी साक्षीदार होवून केजरीवाल यांचेवर आरोप केला आहे त्या शरथ रेड्डीची शासकीय यंत्रणा मार्फत चौकशी सुरु असताना त्याने भाजपला निवडणूक रोखे दिले आहेत. (ऑरबिंदो फार्मा सुमारे ३५.४ कोटी रुपये) याचा अर्थ सदर साक्षीदारावर सरकारी दबाव असून त्याने भाजपशी रितसर तडजोड करत खंडणी भरलेली आहे.बातमी क्रमांक २) आयकर विभागाने काँग्रेस पक्षाला नियमबाह्य पध्दतीने १७०० कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. याआधीही २१० कोटीचा दंड ठोठावला आहे. वास्तविक प्राप्तिकर कायदा १९६१ च्या कलम १४७, १४८ नुसार आयकर विभागास एखाद्या व्यक्ती वा संस्था तथा राजकीय पक्षाने आयकर रिटर्न भरणा केल्यानंतरही मागील ६ वर्षांतील आयकर भरणा केव्हाही तपासण्याचा अधिकार होता. मात्र हा नियमच सन २०२१ च्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बदलून मागील ३ वर्षापर्यंतच भरलेल्या आयकराची चौकशी केली जाईल असा केला. याशिवाय दिल्ली उच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२३ मध्ये ५० लाखांच्या आतील आयकर भरण्याची प्रकरणे मागील ३ वर्षांपेक्षा अधिक काळाची नव्याने उघडता येणार नाहीत म्हणून निवाडा दिलेला आहे. काँग्रेस पक्षावर आयकर विभागाने केलेली दंडाची कारवाई आर्थिक वर्ष सन १९९५-९६, सन २०१७-१८ आणि सन २०२०-२१ या आर्थिक वर्षांबाबत आहे. यापैकी याच सरकारने आयकर कायद्यात केलेल्या बदलानुसार सन २०२०-२१ वगळता मागील २०१७-१८ व १९९५-९६ या वर्षांतील आयकर रिटर्न बाबतची कारवाई नियमबाह्य व असंविधानिक आहे. मुळात ही कारवाई काँग्रेसची बँक खाती गोठवून त्यांना लोकसभा निवडणुकीत पैसे खर्च करताच येऊ नये व त्यांचे उमेदवार जिंकू नये म्हणून केलेली आहे. या कारवाईच्या विरोधात न्यायालयात दाद मागितली तरी निकाल लोकसभा निवडणूकीच्या पूर्वी लागणार नाही. हे सर्वसामान्य मतदारांना समजले तर सत्ताधाऱ्यांना जड जाईल.

या दोन्ही बातम्यांवर सोशल मेडीयावर चर्चा झाल्यास सामान्य मतदारांपर्यंत पोहोचतील. मतदार शहाणे होतील आणि सत्तेच्या माध्यमातून सुरु असलेली झोटींगशाही सर्वसामान्यांना सोशल मेडीयातून समजणे सत्तेच्या हिताचे नाही. ते होवूच नये म्हणून शहाण्या विरोधक नेटीझन्सना सातत्याने प्रधान प्रचारकांचे भंपक फोटो, व्हिडिओ दिले जातात. मग आपसूकच मुख्य सत्य बातम्या दडपल्या जातात. एक सूज्ञ विरोधक सत्ताधाऱ्यांच्या मैदानावर जाऊन त्यांनी टाकलेल्या बॉलवर खेळत बसण्यापेक्षा, सत्ताधाऱ्यांच्या पायात बॉल टाकून त्यांना खेळबाद करण्यात व्यस्त असला पाहिजे! पण आपल्याकडे उलटी गंगा वाहतेय!

लोकसंसद

राज्यातील घटता बाल मृत्युदर दिलासादायक

राज्यातील बालमृत्यू कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण विभागाकडून सातत्याने करण्यात येत असलेल्या प्रयत्नांमुळे गेल्या काही वर्षांत राज्यातील बालमृत्यू दरात चांगली घट झाली आहे. केंद्र सरकारच्या २०१८च्या नमुना नोंदणी प्रणाली (एसआरएस) अहवालानुसार महाराष्ट्रात नवजात मृत्युदर हा प्रति एक हजार जन्मामागे १९ एवढा होता. तो घटून २०२० च्या अहवालानुसार १६ वर आला आहे. तर नवजात मृत्युदर हा प्रति एक हजार १३ इतका होता, तो आता ११ पर्यंत खाली आला आहे. विशेष म्हणजे संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास उद्दिष्टांनुसार (सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स) सन २०३० पर्यंत नवजात मृत्यू दर १२ पेक्षा कमी करण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले असताना राज्याने हे उद्दिष्ट २०२० मध्येच पूर्ण केले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये राज्याच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाकडून गर्भवती मातांची आणि बालकांची काळजी घेण्यासाठी नवसंजीवनी योजना, जननी शिशु सुरक्षा योजना यासारख्या अनेक पूरक उपाययोजना राबविण्यात आल्या. आजारी नवजात शिशू तसेच कमी वजनाच्या बालकांवर उपचार करण्यासाठी राज्यात एकूण ५३ विशेष नवजात शिशु देखभाल कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. जननी शिशू सुरक्षा योजनेअंतर्गत ० ते १ वर्ष वयोगटातील बालकांवर मोफत उपचार, आहार अशा सुविधा देण्यात येतात.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

मराठी साहित्यिक दिनविशेष

एक एप्रिल

१८८९:- संस्कृत साहित्य, ज्योतिषशास्त्र, पाश्चात्य तत्वज्ञान आदी विषयांचे अभ्यासक, लेखक दाजी नागेश आपटे यांचा जन्म. त्यांचा 'नरकाचा दरबार' हा लेख छापल्याने 'भाला'कार भोपटकरांना कारावास घडला. त्यानंतर राजकीय लेखन सोडून देऊन आपटे यांनी 'सुधारणा आणि प्रगती','नीतिशास्त्र प्रबोध','सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र' तसेच 'इंद्रधनुष्य, साहित्यप्रकाश' हे स्फुटलेखसंग्रह लिहिले. **१९१०:-** लेखक, स्वातंत्र्यसेनानी डॉ. विष्णू महादेव गोगटे यांचा जन्म. ह्यांचे 'उगवता दिवस' हे प्रत्येक दिवसांचे सांस्कृतिक, शैक्षणिक, ऐतिहासिक महत्त्व सांगणाऱ्या पुस्तकाशिवाय 'द्रव्यगुण विज्ञान' हे आणखी एक पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९१९:-** लोकमत नावाचे राष्ट्रगीत बाण्याचे साप्ताहिक सदाशिवराव हणमंत बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली सुरु. **१९२४:-** लेखक डॉ. कृष्णानंद शंकर गोगटे यांचा जन्म. 'प्रतिमा पूजेतून मनोतप' हे अध्यात्मिक विषयांवरील पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९२७:-** जैन साहित्याचे दालन मराठीत उजेडात आणणारे संशोधक डॉ.सुभाषचंद्र अक्कोळे यांचा जन्म. 'प्राचीन मराठी जैन साहित्य' या ग्रंथाबरोबर काही संपादने त्यांच्या नावावर आहेत. **१९३५:-** लेखक यशवंत कृष्णाजी भागवत यांचा जन्म. ह्यांच्या 'अग्निरेखा','कोवळी किरणे','दिव्यदृष्टी','निर्माल्य' मिळून दहा एक कादंबऱ्या त्यांच्या नावावर आहेत. **१९३८:-** कथाकार लोकनाट्य लेखक वामन गोविंद होवाळ यांचा जन्म. तत्कालीन मासिकातून त्यांच्या कथा प्रसिध्द. 'बेनवाड', 'येळकोट' 'वारसदार', 'वाटाआडवाटा' हे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित. त्यांनी काही लोकनाट्यही लिहिलीत. 'नाम्या म्हणे मी उपाशी आहे', 'आंधळ्याची वरात बहिऱ्याच्या घरात' ही त्यांची लोकनाट्य गाजली. त्यांच्या कथा प्रामुख्याने ग्रामीण भागातील दलित विश्वाचे चित्र रेखाटणाऱ्या आहेत. तसेच मुंबईच्या झोपडपट्ट्यांतून जगणाऱ्यांचे कष्टकऱ्यांचे जीवन त्यांच्या लेखनातून साकारले. **१९३९:-** नियतकालिकांतून नाट्य, लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोक कला, स्त्रीविषयक प्रश्नांतर लेखन करणाऱ्या लेखिका, अनुवादक मराठीसह हिंदी साहित्याच्या जाणकार प्रा. डॉ. तारा चिंतामणी भवाळकर यांचा जन्म. ह्यांचे 'प्रियतमा' हे गडकऱ्यांच्या साहित्य सृष्टीतील स्त्री प्रतिमेवर, 'मधुशाला' हा हरिवंशराय बच्चन यांच्या काव्याचा अनुवाद. 'पक्षगान आणि मराठी नाट्यसंपदा' हा समीक्षात्मक ग्रंथ, 'राणीसाहेब रुसल्या' ही एकांकिका, याशिवाय 'मिथक आणि नाटक','महामाया','लोकनागर रंगभूमी' अशी अभ्यासपूर्ण ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९४०:-** थोर मराठी साहित्यिक सीताराम बाबाजी गुर्जर यांचे निधन. नाटककार, भाषांतरकार म्हणून मराठी साहित्यात त्यांनी मोलाची भर घातली. बाणाच्या कादंबरीच्या उत्तरार्धाचे त्यांनी जे सुरेख भाषांतर केले त्याला होळकर सरकारकडून पारितोषिक मिळाले. 'उदार दामोदर','संगीत रत्नावली' तसेच 'सीता' ही कादंबरीही त्यांनी लिहिली. विशेषतः रत्नावली नाटकातील पदे प्रासादिक व मधूर आहे. जगन्नाथ पंडितांच्या अश्वघाटीचे साकी वृत्तांतात त्यांनी केलेले 'अश्वघाटीप्रबोधिका' हे भाषांतरही हृदयाला भिडणारे आहे. त्यांचे साहित्यातील चिरस्मरणीय कार्य म्हणजे केसरीच्या सुवर्णदिनानिमित्त तयार करण्यात आलेल्या ग्रंथासाठी 'संस्मरणीय दिवंगत व्यक्ती' या मथळ्याखाली एक सुचीवजा लेख त्यांनी तयार केला. **१९४०:-** लेखक, माजी आमदार, खासदार महादेवराव शिवणकर यांचा जन्म. ह्यांच्या प्रकाशित ग्रंथात 'कारागृहाच्या भिंती' ह्या आत्मवृत्तासह 'वेगळा विदर्भ का?', 'किमान कर्जमुक्ती' ह्या वैचारिक ग्रंथावर 'केनिया सफारी' हा प्रवासवर्णनात्मक ग्रंथ प्रसिध्द. **१९५०:-** लेखक दिलीप देवधर यांचा जन्म. त्यांच्या प्रकाशित ग्रंथसंपदेत 'अटलजीका मिशन आयटी सुपरेशन', 'संघोपनिषद', 'शाखा महात्म्य', 'फिलॉसाफी ऑफ आर एस एस', नेटवर्क, 'भाजप मित्र परिवार व रा. स्व संघ' इत्यादी.**१९५१:-** मराठी भाषेचे दालन अहिराणी भाषेत फुलवणारे आणि या भाषेतून कथाकथन करणारे एकमेव साहित्यिक नानासाहेब सुभाष आहिरे यांचा जन्म. आहिराणी भाषेत लेख, कविता, एकांकिका चित्रपट, कथा त्यांनी लिहिल्या. मराठीसह वऱ्हाडी भाषेतही त्यांनी लिखाण केले. तथापि आहिराणी भाषेतून 'गावचं गावपनफ हा वैचारिक लेखसंग्रह,' 'बयंबा' हा आहिराणी काव्यसंग्रह, 'पस्तावा', 'भट यांनी माय' हा कथासंग्रह मिळून बरेच लिखाण केले. **१९५२:-** लेखक प्रा. डॉ. अशोकरा

लोकसभेच्या रणांगणात नणंद-भावजयची लढत

। पुणे । वृत्तसंस्था ।

राज्यात गेल्या पाच दशकांपासून ज्या नावाभोवती राजकारणाचा, समाजकारणाचा, आरोप प्रत्यरोपांचा आणि अनेक कपोलकल्पितांचा केंद्रबिंदू ठरला आहे, अशा पवार कुटुंबियांमध्ये अभूतपूर्व अशी फूट पडली आहे. अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची दोन तुकडे करून भाजपच्या मांडीला मांडी लावून बसल्यानंतर पहिल्यांदाच पवार कुटुंब निवडणुकीला सामोरे जात आहे. त्यामध्ये आता थेट बारामतीमध्ये सुनेत्रा पवार विरुद्ध सुप्रिया सुळे अशी लढत म्हणण्यापेक्षा अजित पवार विरुद्ध शरद पवार अशी बारामतीसह पुणे जिल्ह्यातील तसेच राज्यातील राजकीय अस्तित्वाची असेल. या लढाईत बारामतीची काका की पुतण्याची याचा सुद्धा फैसला होणार आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून सुप्रिया सुळे यांना उमेदवारी औपचारिकपणे जाहीर करण्यात आली आहे, तर अजित पवार गटाकडून त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना रिंगणात उतरवले आहे. त्यामुळे ज्या पवार कुटुंबाने गेल्या साडेपाच

दशकांपासून महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये आपले दबदबा ठेवला, कौटुंबिक नाती किती महत्त्वाची आहे हे प्राधान्याने दाखवून देण्याचा प्रयत्न केला, राजकारण घरापर्यंत कधी येऊ दिले नाही ते आज कुटुंबच पूर्णतः राजकारणामध्ये विभागले गेले आहे. अजित पवार यांनी बंडाळी केल्यानंर राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह अजित पवार यांच्या वाट्याला गेलं आहे. त्यामुळे बारामतीतील लढाई ही पहिल्यांदाच या सर्व घडामोडीनंतर असणार आहे.

पक्ष फुटल्यानंतर कुटुंबातही फूट

बारामतीमध्ये सुनेत्रा पवार आणि सुप्रिया सुळे अशी लढत होत असली तरी ही लढत निश्चितच या दोघींमधील नसेल. अजित पवार आणि शरद पवार यांच्यामधील या नेत्यांमध्ये असणार आहे. बारामतीवर वर्चस्व कुणाचा असणार याचे उत्तर देणारी ही निवडणूक असणार आहे. गेल्या काही दिवसांपासून बारामतीची जागा सातत्याने चर्चेत होती. जेव्हा सुनेत्रा पवारांच्या उमेदवारीचा विषय चर्चेत आला, तेव्हा बारामतीमध्ये ठिणग्या पडण्यास सुरुवात झाली. पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला मिळाल्यानंतर अजित पवार यांनी सातत्याने शरद पवार आणि सुप्रिया सुळेंवर टीका केली होती.

या टीकेचे पडसाद पवार कुटुंबामध्ये सुद्धा उमटले आहेत. अजित पवारांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार, पुतणे युगेंद्र पवार, विरोधात गेले आहेत. पवार कुटुंबामध्ये सुद्धा पक्षांतर्गत झालेल्या घडामोडीवरून परिणाम झाल्याचे दिसून आलं आहे. बारामतीमधून निवडणूक लढवण्याचे निश्चित केल्यानंतर अजित पवार यांनी सातत्याने शरद पवार बारामतीमध्ये भावनिक करतील वगैरे असे आरोप करत वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यानंतर ते स्वतःच भावनिक वातावरण करताना दिसून आले. मला कुटुंबामध्ये एकटं टाकलं गेला आहे, तुम्ही मला एकटं टाकू नका, अशा पद्धतीने प्रचार करताना दिसून आले. त्यामुळे या निवडणुकीला भावनिक किनार सुद्धा असणार आहे.

अजित पवारांचा सख्खा भाऊ विरोधात

अजित पवार यांनी बारामतीमध्ये शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यावर टीका सुरू केल्यानंतर त्याचे पडसाद पवार कुटुंबियांमध्ये उमटले. अजित पवार यांची सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांचे चिरंजीव युगेंद्र पवार हे पहिल्यांदा अजित पवारांविरोधात बोलताना थेटपणे दिसून आले. आमदार रोहित पवार सुप्रिया सुळे आणि शरद पवारांच्या मागे खंबीरपणे उभे राहिले आहेत. युगेंद्र यांनी राजकीय भूमिका घेतल्यानंतर त्यांचे वडील श्रीनिवास पवार यांनी सुद्धा काटेवाडीमध्ये गेल्यानंतर अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली होती. शेत कसायला दिले म्हणून शेतीचे मालक होत नाही अशा शब्दात त्यांनी अजित पवारांवर तोफ डागली होती.

लोकसभेसाठी 'प्रहार'ची चाचपणी

कडूंचा पदाधिकाऱ्यांसोबत संवाद

। छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था।

अमरावती लोकसभा निवडणूक रिंगणात उमेदवार देणाऱ्या प्रहार जनशक्ती पक्षाने आता अन्य मतदारसंघातही चाचपणी सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर पक्षनेते आ. बच्चू कडू यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेत मत जाणून घेतले. यात जालन्यातील भाजपचे उमेदवार विरोधात प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. दरम्यान, ही प्राथमिक बैठक असून कार्यकर्त्यांचा मेळावा घेत निर्णय नंतर जाहीर करू; तसेच जालना येथील खासदारांच्या संदर्भात कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेल्या मत तपासून घेऊ, पाहणी करू असे आ. कडू यांनी सांगितले.

चिकलठाणा विमानतळासमोरील एका सभागृहात शनिवारी आयोजित या बैठकीस छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशीव यासह अन्य जिल्ह्यांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या मतदारसंघाची मुद्दे, अडचणी आदी मांडल्या. त्यात जालना येथील खासदार विकासकामात अडचणी आणतात. प्रहारकडे असलेल्या ग्रामपंचायतीला निधी दिला जात नाही, असा आरोप एका पदाधिकाऱ्यांनी करत निवडणुकीत वेगळा विचार करावा, असे मत मांडले. पदाधिकाऱ्यांनी आपआपले विचार प्रगट केल्यावर पक्षनेते कडू यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ही प्राथमिक बैठक आहे. भावना जाणून घेतल्या असून, कार्यकर्ता मेळावा घेत पुढील निर्णय घेतला जाईल. जालनाच्या संदर्भात कार्यकर्त्यांनी केलेल्या भाष्यबाबत माहिती घेतली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

दक्षिण-मध्य मुंबईत देसाई-शेवाळेंमध्ये लढत

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मुंबई: दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघाने अनेक दिग्गजांना निवडून दिले. यात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, गिरणी कामगारांचे आक्रमक नेते दत्ता सामंत यांचाही समावेश होतो. १९८९ मध्ये वामनराव महाडिक यांच्या रूपाने हा मतदारसंघ शिवसेनेकडे आला. त्यानंतर एक अपवाद वगळता हा मतदारसंघ शिवसेनेकडेच राहिला आहे. १९९१ ते २००९ या कालावधीत सलग पाच लोकसभा निवडणुकीत शिवसेनेच्या मोहन रावले यांनी या मतदारसंघात शिवसेनेचा भगवा फडकवला होता.

२००९च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या एकनाथ गायकवाड यांनी हा मतदारसंघ काँग्रेसकडे खेचला. त्यानंतर मात्र २०१४ आणि २०१९ या दोन्ही लोकसभा निवडणुकीत शिवसेनेच्या राहुल शेवाळे यांनी पुन्हा हा मतदारसंघ शिवसेनेच्या ताब्यात आणला. दक्षिण मध्य मुंबईतून यावेळेस प्रामुख्याने ठाकरे गटाचे अनिल देसाई यांच्या विरोधात शिंदे गटाचे खा राहुल शेवाळे यांच्यात लढत होणार आहे.

राजकीय समीकरणे

शेवाळे यांनी मागच्या निवडणुकीत काँग्रेसच्या एकनाथ गायकवाड यांचा १ लाख ५१ हजार मतांनी पराभव केला होता. शेवाळे यांना सर्वाधिक ९१ हजार मते ही माहीम विधानसभा मतदारसंघातून मिळाली होती. यावेळी माहीमचे आमदार सदा सरवणकर हे शिंदे गटासोबत असल्याने त्याचा फायदा शेवाळे यांना मिळेल. माहीम खालोखाल चेंबूर मतदारसंघात ७५ हजार मते शेवाळे यांना मिळाली होती. मात्र यावेळेला येथील आमदार प्रकाश फातर्फेकर हे उद्धव ठाकरे यांच्यासोबत असल्याने शेवाळे यांना फटका, तर अनिल देसाई यांना येथून आघाडी मिळू शकेल. याशिवाय भाजपच्या कालिदास कोळंबकर यांच्या वडाळा विधानसभेत, भाजपच्या कॅप्टन तमिळसेल्वन यांच्या सायन कोळीवाडामध्ये शेवाळे यांना फायदा होण्याची शक्यता आहे.

२०१९ चे चित्र

राहुल शेवाळे (शिवसेना) विजयी मते : ४,२४,९१३
एकनाथ गायकवाड (काँग्रेस) मते : २,७२,७७४
संजय भोसले (वंचित) मते : ६२,२५६
अहमद शेख (बसप) मते : ८,६२३
विजयी उमेदवाराचे मताधिक्य : १,५२,१३८

शिरूरमध्ये कोल्हे-आढळराव आमनेसामने

। पुणे । वृत्तसंस्था ।

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने शिरूर लोकसभा मतदारसंघासाठी अपेक्षेप्रमाणे विद्यमान खा. डॉ. अमोल कोल्हे यांची उमेदवारी शनिवारी जाहीर केली. माजी खा. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असून, कोल्हे विरुद्ध आढळराव असा सामना पुन्हा रंगणार आहे.

डॉ. अमोल कोल्हे यांनी २०१४ मध्ये शिवसेनेत प्रवेश केला. ते पुणे जिल्ह्याचे शिवसेना संपर्कप्रमुख होते. कोल्हे यांचे

महत्त्व वाढू लागल्याने शिवसेनेचे खा. शिवाजीराव आढळराव पाटील आणि कोल्हे यांच्यात कुरबुरी वाढू लागल्या.

कोल्हे यांची राजकीय महत्त्वकांक्षा स्पष्टपणे जाणवू लागल्याने या दोघांमध्येच यापुढे संघर्ष होणार हे हेरून अजित पवार यांनी कोल्हे यांना तेव्हाच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आणले. २०१९च्या लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर कोल्हे यांना पक्षात घेऊन त्यांना लोकसभेची उमेदवारीही देण्यात आली.

नाटक आणि मालिकेतून छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांची भूमिका वठवून घराघरांत पोहोचलेल्या कोल्हे यांनी आढळरावांचा किल्ला भेदला. शिवसेनेकडून खासदारकीची हॅट् ट्रिक साधलेल्या आढळरावांचा निवडणुकीत कोल्हे यांनी पराभव केला होता.

हर्षवर्धन जाधव पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात

। छत्रपती संभाजीनगर। । वृत्तसंस्था ।

लोकसभा निवडणुकीचं बिगूल वाजलं आहे. छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून शिवसेना ठाकरे गटाचे माजी खा. चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या जागेबाबत अद्यापही तोडगा न निघाल्याने महायुतीकडून उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात आलेली नाही आहे. मात्र, आता जिल्ह्याच्या राजकारणात मोठे ट्विस्ट निर्माण होण्याची शक्यता आहे. माजी

आ. हर्षवर्धन जाधव हे पुन्हा एकदा लोकसभेच्या रिंगणात उतरण्यासाठी इच्छूक आहेत. प्रकाश आंबेडकरांनी संधी दिली तर वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक लढवू असे त्यांनी म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणासाठी राजीनामा देणार मी एकमेव आमदार आहे. जनतेची कामे देखील केलेली आहेत. गेल्यावेळी जलील यांना वंचित बहुजन आघाडीचा पाठिंबा होता. मात्र, आता प्रकाश आंबेडकर त्यांच्यासोबत नाहीत. तर दुसरीकडे खैरेंना देखील फुटीचा मोठा फटका बसू शकतो. शिवसेनेत दोन गट झाले आहेत. मात्र गेल्या वेळी मला जे मतदान झाले ते मतदान मला फिक्स होणार आहे. मला वाटते मी सामान्य जनतेसाठी लढले पाहिजे म्हणून मी पुन्हा एकदा अपक्ष निवडणूक लढवण्याची भूमिका जाहीर केली आहे, असे हर्षवर्धन जाधव यांनी म्हटले आहे.

शिवतारेंना कार्यकर्त्यांचे खरमरीत पत्र

। पुणे । वृत्तसंस्था ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते तथा माजी आ. विजय शिवतारे यांनी अखेर आपली तलवार म्यान केली. गेल्या अनेक दिवसांपासून बारामतीची निवडणूक कुठल्याही परिस्थितीत लढवणारच यावर ते ठाम होते. काहीही झाले तरी मी माघार घेणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली होती. मात्र, आता त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली. इतकेच नाही तर पुरंदरमधून सुनेत्रा पवार यांना ५० हजार मतांची आघाडी देऊ असा दावाही केला. यानंतर सोशल मीडियावर पुरंदर तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या नावाने एक पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाले. यामध्ये शिवतारे यांचा चांगलाच समाचार घेतला.

शिवतारे यांनी ऐनवेळी माघार घेतल्याने कार्यकर्ते संतप्त

झाले आहेत. या पार्श्वभूमीवर एक पत्र सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्या पाच लाख पवार विरोधी मतांनी काय करायचे? असा सवाल कार्यकर्त्यांने पत्रातून शिवतारे यांना केला आहे. 'माझा नेता पलटूराम निघाला' बारामती लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीतून शिवतारे यांनी माघार घेतक्यावर कार्यकर्त्याने लिहिलेले पत्र व्हायरल होत आहे. आता यावर शिवतारे काय भूमिका घेतात? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

का घेतली माघार?

बारामती लोकसभा निवडणुकीतून माघार घेण्याचे कारण शिवतारे यांनी पत्रकार परिषदेतून सांगितले. माझी मुख्यमंत्र्यांशी फोनवर चर्चा झाली. मुख्यमंत्र्यांशी दोनदा प्रत्यक्ष चर्चा झाली. तरीही मी माझा निर्णय बदलला नव्हता. पण मला एक फोन आला. हा फोन मुख्यमंत्र्यांचे ओएसडी खतगावकर यांचा होता. मी ऐकत नव्हतो म्हणून माझ्यावर मुख्यमंत्री रागावलेही होते. मात्र, खतगावकरांचा मला एक फोन आला. मुख्यमंत्र्यांना तुमच्यामुळे अडचण होत आहे. महायुतीला तुमच्यामुळे अडचण होत आहे, असं त्यांनी मला सांगितलं. सर्वच ठिकाणी अपक्ष उमेदवार उभे राहिले तर कदाचित १० ते २० खासदार पडतील अशी परिस्थिती आहे. त्यामुळे आपल्याला मुख्यमंत्र्यांना सांभाळायचं आहे, असे त्यांनी मला सांगितले, अशी माहिती शिवतारे यांनी दिली.

पश्चिम मुंबईत शिवसेनेच्या दोन गटांत लढत

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मुंबईतील उत्तर-पश्चिम लोकसभा मतदारसंघात (वायव्य मुंबई) मागील निवडणुकीत मोदी लाटेत खा. गजानन कीर्तिकर विजयी झाले होते. आगामी निवडणुकीत कीर्तिकर पिता-पुत्र आमने-सामने येतील, अशी चर्चा होती. त्यात ठाकरे गटाने अमोल कीर्तिकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

भाजप युतीत हा मतदारसंघ शिंदे गटाला आला आहे. चित्रपट अभिनेते गोविंदा यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने या मतदारसंघात गोविंदा यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे ठाकरे गटाच्या अमोल कीर्तिकर यांना गोविंदा यांचे

२०१९ चे चित्र

गजानन कीर्तिकर (शिवसेना) मते : ५,६९,०१८
संजय निरुपम (काँग्रेस) मते : ३,०९,५१७
सुरेश शेट्टी (वंचित बहुजन आघाडी) मते : २३,३६७
सुभाष पास (समाजवादी पक्ष) मते : ५,८४७
विजयी उमेदवारांचे मताधिक्य : २,५९,५०१

मोठे आव्हान मिळण्याची शक्यता आहे.

कपील पाटील यांच्या बैठकीकडे किसन कथोरे समर्थकांची पाठ

। कल्याण । वृत्तसंस्था ।

भिवंडी लोकसभेसाठी भाजपकडून केंद्रीय मंत्री कपील पाटील यांची उमेदवारी जाहीर झाल्याने त्यांनी मतदारसंघात भाजप कार्यकर्त्यांच्या बैठकांना सुरूवात केली. मुरबाड तालुक्यातील म्हसा रस्ता येथे आयोजित बैठकीला आ. किसन कथोरे यांच्यासह भाजपचे बूथ प्रमुख, स्थानिक पदाधिकारी यांनी दांडी मारल्याने पाटील-कथोरे यांच्यामधील धुसफूस सुरूच राहणार असल्याची चिन्हे आहेत.

मागील अडीच वर्षापासून केंद्रीय मंत्री कपील पाटील आणि मुरबाडचे भाजप आ. किसन कथोरे यांच्यात जोरदार धुसफूस सुरू आहे. गेल्या वर्षी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी पुढाकार घेऊन आ. कथोरे यांना शांत राहण्याचा सल्ला दिला होता.

भाजप जिल्हा कार्यकारिणीत मंत्री कपील पाटील यांनी आपल्या समर्थकांची वर्णी लावून आ. कथोरे समर्थकांची कोंडी केली. आ. कथोरे यांच्या मुरबाड मतदारसंघात कार्यक्रम घेऊनही त्याला कथोरे यांना डावलण्याचे प्रयत्न पाटील समर्थकांनी केले, असे कथोरे समर्थक सांगतात. कथोरे हे कुणबी समजातील असल्याने मंत्री पाटील यांनी वेळोवेळी कुणबी विषयावर भाष्य करून कथोरे यांना डिवचण्याचा प्रयत्न केला.

या सगळ्या प्रकाराने भिवंडी लोकसभा मतदारसंघातील मुरबाड, शहापूर, भिवंडी ग्रामीण, वाडा तालुक्यातील काही भागातील कुणबी समाज मंत्री पाटील यांच्यावर नाराज आहे.

भिवंडी लोकसभेसाठी आपणही प्रयत्नशील असल्याचे भाष्य केल्यानंतर पाटील यांनी कथोरे यांना लक्ष्य केले होते. हा राग आ. कथोरे आणि त्यांच्या समर्थकांमध्ये ठासून भरला आहे. भिवंडी लोकसभेची उमेदवारी घोषित झाल्यानंतर केंद्रीय मंत्री कपील पाटील यांनी आमदार कथोरे यांच्या बदलापूर येथील घरी जाऊन त्यांची भेट घेऊन सहकार्य करण्याची मागणी केली असली तरी, आ. कथोरे त्या मागणीला किती साद देतात हे मुरबाड म्हसा रोड येथील त्यांच्या आणि समर्थकांच्या अनुपस्थितीवरून स्पष्ट झाले आहे.

दक्षिण मुंबईत ठाकरेंकडून तगडा नेता मैदानात

। मुंबई । वृत्तसंस्था ।

एकीकडे वाळकेश्वर, मलबार हिल यासारखा उच्चभ्रू मतदारांचा परिसर, तर दुसरीकडे भेंडीबाजार, नागपाडा, डोंगरी यासारखा सर्वसामान्य मुस्लिम मतदारांचा परिसर कुठे गिरगाव, लालबाग, परळ यासारखी मराठमोळी वस्ती, तर कुठे डॉकयार्ड रोड, रे रोड येथे बाहेरून आलेल्या गरिबांची वस्ती असा सर्व मिळून दक्षिण मुंबई मतदारसंघ बनलेला आहे.

महालक्ष्मी रेसकोर्स, जिजामाता प्राणीसंग्रहालय यासारखा निसर्गरम्य परिसर आणि मुंबई शेअर बाजार, मंत्रालय, विधानभवन आणि महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू असलेला वर्षा बंगला याच मतदारसंघात येतो. काँग्रेसच्या मुरली देवरा आणि मिलिंद देवरा यांनी सहा वेळा या मतदारसंघात झेंडा रोवला असला तरी दोन वेळा हा मतदारसंघ शिवसेनेच्या अरविंद सावंत यांनी आपल्या ताब्यात ठेवला आहे.

यावेळेलाही उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून अरविंद सावंत यांची उमेदवारी जाहीर झाली असून महायुतीकडून मात्र, अद्याप उमेदवार जाहीर न झाल्याने काहीसे गोंधळाचे वातावरण दिसते. भाजपकडून राहुल नार्वेकर, मंगलप्रभात लोढा यांची, शिंदे गटाकडून मिलिंद देवरा यांची, तर मनसेकडून बाळा नांदगावकर यांच्या नावांची चर्चा असली तरी ऐनवेळी भलताच उमेदवार येथून लढण्याची शक्यता नाकारता येत नाही. सन २००९च्या लोकसभा निवडणुकीत येथून काँग्रेसचे मिलिंद देवरा निवडून आले होते. त्यानंतर २०१४ आणि २०१९ या दोन्ही वेळेला अरविंद सावंत निवडून अले.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मनसेच्या बाळा नांदगावकर यांनी जवळपास ८५ हजार मते घेतली होती. मनसे महायुतीत आल्यास त्यातील किती मते महायुतीच्या उमेदवाराला मिळतील ते पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

महायुतीचे अद्याप ठरेना

राजकीय समीकरणे

दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघांपैकी आताच्या घडीला दोन ठाकरे यांच्या शिवसेनेकडे, दोन भाजपकडे आणि एक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे, तर एक काँग्रेसकडे आहे. ठाकरे यांच्या शिवसेनेकडे असलेल्या दोन विधानसभांपैकी वरळी आणि शिवडी या दोन मतदारसंघांत उद्धव ठाकरे यांना मानणाऱ्या कट्टर शिवसैनिकांची फौज आहे. भायखळा विधानसभेच्या आ. यामिनी जाधव यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला असला तरी या मतदारसंघात मुस्लिम मतदारांचे चांगलेच प्राबल्य आहे. याशिवाय काँग्रेसच्या अमिन पटेल यांच्याकडे असलेल्या मुंबादेवी विधानसभेतही मुस्लिमांची मोठी संख्या आहे.

नाशिकचा गुंता सुटेना

नाशिक : नाशिक लोकसभा मतदारसंघाचा पेच महायुतीत अद्याप कायम आहे. शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खा. हेमंत गोडसे यांनी उमेदवारी जाहीर होण्याआधीच प्रचाराला सुरुवात केली आहे. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांनीही नाशिकची जागा लढवण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. त्यात भाजपदेखील नाशिकच्या जागेसाठी आग्रही आहे.

आता महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नाशिकच्या जागेबाबत वक्तव्य केले आहे. एकीकडे नाशिकच्या जागेवरुन महायुतीत तिढा कायम असतानाच दुसरीकडे नाशिक भाजप कार्यालयात वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली.

या बैठकीत नाशिक आणि दिंडोरी लोकसभेचा आढावा घेण्यात आला आहे. या बैठकीला गिरीश महाजन, राधाकृष्ण विखे पाटील यांची उपस्थिती होती. नाशिकची जागा भाजपलाच मिळावी, अशी मागणी नाशिकच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी केली आहे.

मोहिते-पाटलांच्या घराण्यात उमेदवारी नाकारली

। सोलापूर । वृत्तसंस्था ।

माढा लोकसभा मतदारसंघातून सत्ताधारी भाजपने ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांचे पुतणे धैर्यशील मोहिते-पाटील यांना उमेदवारी नाकारून विद्यमान खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना पुनःश्च संधी दिल्यामुळे मोहिते-पाटील कुटुंबीयांची नाराजी कायम आहे. यातून माढ्यातील राजकीय घडामोडींकडे सर्वांच्या नजरा वळल्या आहेत. परंतु, मोहिते-पाटील यांना एखाद्या निवडणुकीत उमेदवारी नाकारण्याचा हा पहिलाच प्रसंग नाही. अशा प्रसंगातून सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनाही जावे लागले होते. १९७२ सालच्या गाजलेल्या अकलूजच्या लक्षभोजन प्रकरणामुळे सहकारम हर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांचे त्यावेळी विधानसभेचे तिकीट कापण्यात आले होते.

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनाही पुढे १९७८ सालच्या विधानसभा निवडणुकीत जनता लाटेत पाणीवचे शामराव पाटील यांच्याकडून पराभूत व्हावे लागले होते. त्यांच्या पश्चात त्यांचे पुत्र विजयसिंह मोहिते-पाटील यांनी घराण्याचा वारसा पुढे नेताना पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारणात दबदबा निर्माण केला. उपमंत्रीपासून ते उपमुख्यमंत्रिपदापर्यंत

वाटचाल करताना त्यांनी सुवर्णकाळ अनुभवला. परंतु, २००९ नंतर त्यांची राजकीय पीछेहाट होत गेली. पाच वर्षांपूर्वी राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांची साथ सोडून त्यांनी थेट भाजपमध्ये प्रवेश करणे पसंत केले. मात्र, यंदा माढा लोकसभा निवडणुकीसाठी त्यांचे पुतणे धैर्यशील यांना भाजपने तिकीट नाकारून त्यांचा हिरमोड केला आहे. १९७२ साली लक्षभोजन प्रकरणामुळे शंकरराव मोहिते-पाटील यांचे आमदारकीचे तिकीट कापण्यात आले असता त्यांनी आपल्या एका सहकाऱ्याला विधानसभेवर बिनविरोध निवडून आणण्याची किमया सहजपणे केली होती. परंतु, बदलत्या राजकीय वातावरणात याच मोहिते-पाटील कुटुंबीयांतील धैर्यशील यांना भाजपने माढा लोखसभेचे तिकीट नाकारल्यानंतर मोठाच संघर्ष करावा लागत आहे.

क्रा व नि

जुगाऱ्यांविरोधात गुन्हा

पनवेल : कोपरा गाव पाईपलाईन येथे काहीजण जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस त्या ठिकाणी गेले असता सात ते आठ जण पैसे समोर ठेवून जुगार खेळत असल्याचे दिसून आले. यावेळी काहींनी पोलिसांना पाहून खड्ड्यांमध्ये व पाईपवरून उड्या मारून पळून गेले. यातील गुरु तोडेकर पोलिसांच्या ताब्यात सापडला असून त्यांच्या विरोधात जुगार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कर्मचाऱ्यानेच केली चोरी

पनवेल : पनवेल शहरातील एका हॉटेलमध्ये रिसेप्शनीस्टचे काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने हॉटेलमधील काऊंटरमध्ये ठेवलेले ३३ हजार ८०४ रुपये चोरी करून पळून गेल्याची घटना घडली आहे. अमन केडीया (३२) असे या चोरट्याचे नाव असून त्याने हॉटेलच्या काऊंटरमध्ये ठेवलेले व ग्राहकाने रुम भाड्याचे दिलेले पैसे असे एकूण ३३ हजार ८०४ रुपये घेवून पसार झाला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

भगिनींची जल्लोषात रंगपंचमी

मुरूड-जंजिरा : मुरूड तालुक्यातील शिंपी समाज महिलांनी शनिवारी (दि.३०) सायंकाळी समुद्रकिनारी रंगाची उधळण करीत जल्लोषात रंगपंचमी साजरी केली. या उसत्वात सुनीता करंबे, प्रज्ञा सद्रे, अश्विनी करंबे, गीता सुकाळे, निमा नाझरे, उमा बागडे, राजश्री सद्रे, प्रतिभा बागडे, शिवानी नाझरे, रोशनी सद्रे, श्रद्धा कजबजे आदी शिंपी समाज महिलांनी सहभाग घेत विविध रंगाची उधळण करीत रंगपंचमीचा आनंद मनमुरादपणे लुटला.

रोह्यात व्याख्यानाचे आयोजन

खांब : छत्रपती शिवाजी महाराजांनी अमावस्या-पौर्णिमेचा विचार न करता येईल तो दिवस शुभ मानून आदर्शवत राज्यकारभार केला असल्याने अंधश्रद्धा निर्मूलनाचे खरे कार्य छत्रपती शिवाजी राजांनी केले असल्याचे विधान व्याख्याते तथा सामाजिक कार्यकर्ते किशोर काळोखे यांनी केले. रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी येथे संपन्न झालेल्या शिवजयंती सोहळ्यानिमित्त आपल्या व्याख्यानाचे वेळी उपस्थितीतांना संबोधित करताना ते बोलत होते.

शिमगोत्सवात काजूगर स्वस्त

माणगाव: ऐन शिमगोत्सवात काजूगर स्वस्त झाल्याने खवय्यांनी समाधान व्यक्त केले आहे. माणगाव तालुक्यातील बाजारपेठेत काजू गराची आवक वाढल्याने महाग मिळणाऱ्या काजू गरांना स्वस्ताई आली आहे. रानमेव्यासाठी प्रसिद्ध असलेली माणगाव तालुक्यातील बाजारपेठ ओल्या काजूच्या विक्रीचे एक केंद्र बनत आहे. आजूबाजूच्या डोंगरातील वस्तीवरून विक्रीस येणाऱ्या आदिवासी महिलांना रोजीरोटीचे चांगले साधन यानिमित्ताने उपलब्ध झाले आहे.

मुरुड तालुका तापला

। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।
हवेतील उष्णतेचे प्रमाण वाढले असून येत्या २४ तासात उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान खात्याने वर्तविला आहे. दुपारी रस्त्यावरून चालताना किंवा दुचाकीने जाताना उष्णतेच्या झळा लागत असून तापमान ३६ अंश सेल्सियलसवर पोहोचले असून तीव्रता वाढत आहे. हवामान खात्याच्या अनुमानानुसार मध्य महाराष्ट्र, कोकण आदी भागात उष्णतेची तीव्रता वाढत राहील.

- **२४ तासांत उष्णतेच्या लाटेचा इशारा**
- **मुरूडमधील तापमान ३६ पार**

समुद्रकिनारी असणाऱ्या मुरूड तालुक्यात सध्या तापमानाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्याचे जाणवत आहे. पर्यटकांचा शुकशुकाट दिसत असून पर्यटन व्यवसाय थंडावला आहे. मुरूड तालुक्याचे तापमान ३५ ते ३६ अंश सेल्सियसवर गेले आहे. पश्चिमेकडून समुद्रकिनारी देखील गरम हवेच्या झळा वाहत आहेत. समुद्रकिनारी भागातील हवेत मिठाचे प्रमाण असल्याने दमट हवामान नेहमी असते.

कोकणात उष्णतेच्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनी दुपारच्या रखरखीत उन्हात जाऊ नये, छत्री, टोपीचा वापर करावा, कामाशिवाय दुपारी बाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, डांबरी रस्ते जबरदस्त तापून त्याची गरम वाफेचा त्रास दुचाकीस्वारांना होताना दिसत आहे.

आधिक वेळ अशा कडक उन्हात काम करीत राहिल्यास उष्माघाताची शक्यता असते. स्ट्रोक येऊ शकतो. रक्तदाब देखील अचानक वाढू शकतो. अशातच होळीच्या दिवशी जळगाव शहरात अचानक उष्माघाताने ५५ वर्षीय रिक्षा चालकाचा रिक्षा चालवीत असताना मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अति उष्णतेमुळे मानवी शरीरातील अववय निकामी होऊन मृत्यू होतो, असे डॉक्टर सांगतात. यालाच उष्माघात असे म्हणतात. चक्कर येणे, डोके दुखणे, उलट्या होणे अशी उष्माघाताची प्राथमिक लक्षणे आहेत.

उन्हाळी दिवसात लिंबू पाणी, नारळपाणी, कलिंगड, सब्जा टाकून सरबतांचे सेवन करावे. उष्ण वस्तू सेवन करू नयेत, भरपूर पाणी प्यावे. विनाकारण बाहेर जाणे टाळावे. आधिक माहिती घेता असे कळते की, राजस्थान, गुजरात राज्यात उष्णतेचा पारा ४२ वर गेला आहे. रविवारी महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात तापमान पारा ४२.५ इतका पोहचला आहे. उर्वारीत राज्यात देखील उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

बोर्ली, मांडला शाळांतून मतदार जनजागृती रॅली

। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।

बोर्ली आणि मांडला केंद्रातील शाळांम धून मतदार जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली. मुरुडचे गट शिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी दोन्ही केंद्रातील सर्व प्राथमिक, उच्च प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी घोषणा देत प्रभातफेरी काढली होती.

यावेळी विद्यार्थ्यांच्या हातात भारतीय संविधान, मतदान, प्रौढ आणि गुप्त मतदान पद्धती, मतदारांचा हक्क व कर्तव्य याबाबत उद्बोधन करणारे फलक देण्यात आले होते. मुलांना या रॅलीत पाहून पालकही या जनजागृतीत सामील झाल्याचे आश्वासक चित्र दिसून आले. रॅलीत बोर्ली आणि मांडला केंद्रातील साधारणपणे तीस शाळांचे १५०० विद्यार्थी सामील झाले होते. 'मतदार जनजागृती' या विषयावर वक्तृत्व, निबंध आणि चित्रकला स्पर्धांचेही शाळास्तरावर आयोजन करण्यात आले होते.

कर्जतमध्ये मतदार जनजागृती रॅली

। नेरळ । प्रतिनिधी ।

मावळ लोकसभा मतदार संघातील कर्जत मतदारसंघात मतदारांनी जास्तीतजास्त मतदान करावे यासाठी निवडणूक विभागाच्यावतीने मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली होती. या रॅलीमध्ये प्रामुख्याने सायकल घेऊन तरुण सहभागी झाले होते. खोपोली येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कर्जत येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी १९ किलोमीटर रॅली काढून जनजागृती करण्यात आली.

कर्जत-खालापूर तालुक्यातील खोपोली नगरपरिषद तसेच खालापूर नगरपरिषद आणि दोन जिल्हा परिषद यांचा समावेश १८९ कर्जत विधानसभा मतदारांघात आहे. या मतदारसंघात सुमारे साडेतीन लाख मतदार आहेत. या सर्व मतदारांनी मतदान करावे आणि लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे यासाठी मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली होती. या रॅलीमध्ये प्रांत अधिकारी आणि मावळ लोकसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे, पोलीस उप अधीक्षक तेले, तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, तहसीलदार आयुब तांबोळी यांच्यासह निवडणूक विभागाचे अधिकारी शिक्षक तसेच नागरिक सहभागी झाले होते.

तहसीलदारांमुळे रुग्णाला दिलासा

पनवेल : खारघरमध्ये वास्तव्य करणारे दीपक पिल्ले यांना हृदयविकाराचा त्रास असल्याने डॉक्टरांनी हृदय शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला होता; परंतु, त्यांची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे खासगी रुग्णालयात शस्त्रक्रिया करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हते. रुग्णालयाशी संपर्क साधला असता रुग्णाकडे नारंगी रेशनकार्ड असेल तर मोफत हृदय शस्त्रक्रिया होऊ शकते, असे सांगण्यात आले. पिल्ले कुटुंबाकडे शिधापत्रिका नव्हती, मात्र वडिलांच्या पांढऱ्या शिधापत्रिकेत नाव होते. त्यामुळे योजनेचा लाभ घेता येत नव्हता. तहसीलदार विजय पाटील यांनी शिधापत्रिका वेगळी करून दिली. त्यामुळे रुग्णावर मोफत हृदय शस्त्रक्रिया पार पडली.

धर्माधिकारी महाविद्यालयास नॅककडून 'ब' मानांकन

। कोलाड । वार्ताहर ।

येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवे या महाविद्यालयात नॅक बेंगलोरकडून 'ब' मानांकन मिळाले आहे. या टीममध्ये मुख्य प्रतिनिधी म्हणून डॉ. संतोष कुमार व विमल बराह यांनी १३ व १४ मार्च या दोन दिवसात यशस्वीपणे तपासणी केली.

दोन दिवसीय मूल्यांकनासाठी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी तसेच पालकांचे विशेष सहकार्य लाभले होते. सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले. तसेच, महाविद्यालयाला 'ब' नामांकन मिळाल्याबद्दल संदीप तटकरे यांनी सर्वांचे अभिनंदन केले. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयाला नॅकने दिलेल्या 'ब' नामांकनामुळे महाविद्यालयाच्या मानांकनात मानाचा तुरा खोवलेला दिसून येतो. या यशाबद्दल पंचक्रोशीतील, रायगड व कोकण आणि मुंबई विद्यापीठातील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी विश्वास देशमुख व सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी संस्थेचे सचिव संदीप तटकरे, अजित तेलंगे, प्रकाश सरकले, देवेंद्र चांदोरकर, डॉ. विश्वास देशमुख, गीता द. तटकरे, विपुल मसाळ, हजारे, अमोल गोलीपकर, डॉ. सतीश सावळे, मोहन गीतू नेहल प्रधान आदि उपस्थित होते.

अग्नीविर श्रावणीचा नागरी सत्कार

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

अग्नीविर म्हणून भारतीय नौसेनेत नुकतीच निवड झालेल्या श्रावणी जयवंत घरत हिचा चौल-रेवदंडा ग्रामस्थांच्यावतीने नागरी सत्कार करण्यात आला. अग्नीवीर म्हणून भारतीय नौदलात कार्यरत होणारी अलिबाग तालुक्यातील ती पहिलीच मुलगी असून तिचा सार्थ अभिमान आहे. तसेच, श्रावणीचा नागरी सत्कार भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरावा, असे उद्गार माजी राजिप विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे यांनी काढले.

रेवदंडा आंग्रेनगर येथील रहिवाशी असलेली श्रावणी भारतीय नौसेनेत जहाजावरील फायटर जेटमध्ये मिसाईल लोड करणे, उत्पादन व देखभाल विभागात एविएशन (एअर ऑरडिनन्स) या पदावर अग्नीविर म्हणून कोची येथे कार्यरत होणार आहे. तिच्या भारतीय नौसेनेध्ये झालेल्या अग्नीवीर निवडीचे कौतूक व अभिमान सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

याप्रसंगी प्रफुल्ल मोरे, शरद गोंधळी, अशोक नाईक, संदिप खोत, प्रसाद गोंधळी, वैभव चुनेकर, मंगेश वडके, प्रमोद म्हात्रे, तेजस शिंदे, निलेश गाडे, जनार्दन कोंडे, जयवंत घरत आदी मान्यवर उपस्थिती होते.

पनवेलमध्ये पोलिसांचा रुट मार्च

। पनवेल । वार्ताहर ।

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी पनवेल शहर ते करंजाडे पोलीस चौकी असा रुट मार्च काढून पोलीस प्रशासन सतर्क असल्याचे दर्शन त्यांनी यावेळी घडविले.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरपीएफ कंपनीचे एक अधिकारी, ३२ अंमलदार यांच्यासह पोलीस ठाण्यातील दोन पोलीस निरीक्षक, सहा सहाय्यक पोलीस निरीक्षक व ४२ अंमलदार यांनी पोलीस ठाणे हद्दीतील महत्त्वाची मतदान केंद्रे, संवेदनशील परीसर, संमिश्र वस्ती तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने महत्वाची ठिकाणे म्हणजेच पनवेल मनपा येथून मुसलमान मोहल्ला, मिरची गल्ली नाका, टपाल नाका, उरण नाका, मच्छी मार्केट, वडघर, करंजाडे सेक्टर १ ते ५ असा मार्च करुन चौकी येथे समाप्त झाला. सहा वाहनांसह पायी भेटी देवुन त्यांना परीसर व परीस्थितीची माहिती देण्यात आली.

शिवशक्ती मंडळातर्फे रंगपंचमी उत्सव

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल शहरातील अनेक वर्षांपासून सामाजिक व धार्मिक कायार्त अग्रेसर असणाऱ्या लाईन आळी येथील शिवशक्ती मित्र मंडळाने होळी व रंगपंचमी उत्सव विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून साजरा करण्यात आला.

रमेश गुडेकर यांच्यासह गौरव वेदक, संदीप पाटील, खंडेश धनावडे, समीर कदम, प्रकाश वाघे, प्रवीण पोवार, प्रशांत नरसाळे, अरुण ठाकूर, संतोष तळेकर व अनिकेत जाधव आदींसह मंडळातील सदस्यांनी रंगपंचमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा बक्षिस समारंभ मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक

। पनवेल । वार्ताहर ।

तालुका पोलिसांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तसेच सणासुदीच्या निमित्ताने पदाधिकारी यांची बैठक घेवून आवश्यक त्या सुचना व मार्गदर्शन केले.

यावेळी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, गोपनीय विभागाचे अधिकारी कुवर आदींनी त्यांच्या हद्दीतील विविध पदाधिकाऱ्यांची आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तसेच सणासुदीच्या निमित्ताने पदाधिकाऱ्यांची बैठक घेवून त्यांना आवश्यक त्या सुचना व मार्गदर्शन केले. तसेच, आचारसंहितेचे पालन करून सण व उत्सव साजरे करावेत, अशा सुचना सुद्धा त्यांच्याकडून देण्यात आल्या आहेत.

द्रोणागिरी रस्त्याचे काम प्रगतीपथावर

। तळा । वार्ताहर ।
तळा तालुक्यातील प्रसिद्ध द्रोणागिरी देवस्थान रस्त्याचे काम प्रगती पथावर असून रस्त्याच्या सुविधेमुळे द्रोणागिरी यात्रेला नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. द्रोणागिरी डोंगरात वसलेल्या डोनोबाच्या यात्रेसाठी दरवर्षी एप्रिलमध्ये हनुमान जयंतीला भाविक आवर्जून येत असतात. याठिकाणी असलेल्या देव डोनोबा व देवी पद्मावतीचे दर्शन घेऊन देवाची लाट पाहण्यासाठी नागरिकांची एकच गर्दी उसळते.

मात्र, याठिकाणी जाण्या-येण्यासाठी योग्य सुविधा नसल्याने भाविकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत होती. बहुतांश वयोवृद्ध नागरिकांना इच्छा असूनही केवळ वाहतुकीची सुविधा नसल्याने यात्रेसाठी येता येत नव्हते. तसेच, हल्ली प्रखर उन्हातून पायी द्रोणागिरीला जाणे सर्वांनाच शक्य नसल्याने बहुतांश नागरिक यात्रेला जाणे टाळतात. यामुळेच दरवर्षी भाविकांच्या संख्येत घट होत असल्याचे पहायला मिळत होते.

एप्रिल महिन्यात असलेल्या द्रोणागिरी यात्रेच्या अगोदर रस्त्याचे काम पूर्ण व्हावे जेणेकरून जास्तीत जास्त भाविकांना डोंगरावर यात्रेसाठी जाता येईल, अशी अपेक्षा मंत्री महोदयांनी व्यक्त केली होती. तेव्हापासून या रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून जवळजवळ या रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. द्रोणागिरी यात्रे आधी हे काम पूर्णत्वास गेल्यास तालुक्यासह दूरवरून येणाऱ्या भाविकांना डोंगरावर यात्रेला जाणे सोयीस्कर पडणार आहे. यामुळे दरवर्षीच्या तुलनेत यावर्षी द्रोणागिरीवर भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

कल्याणमध्ये वीजपुरवठा बाधित

कल्याण : महापारेषणच्या पडघा ते अंबरनाथ दरम्यानच्या १०० केव्ही वाहिनीमध्ये बिघाड झाल्याने बदलापूर, अंबरनाथ आणि उल्हासनगर चारच्या काही भागांमधील महावितरणच्या ग्राहकांचा वीजपुरवठा बाधित झाला. परिणामी या वाहिनीवरून वीजुपरवठा होणाऱ्या महावितरणच्या बदलापूर पूर्व आणि पश्चिम, अंबरनाथ पूर्व आणि पश्चिम तसेच उल्हासनगर चार उपविभागातील कांही भागांचा वीजपुरवठा बाधित झाला. रविवारी सकाळी सातच्या सुमारास झालेला बिघाड महापारेषणकडून दुरूस्त होईपर्यंत संबंधित भागात भार व्यवस्थापन करून वीजपुरवठा करण्यात आला.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- चेंढरे अलिबाग येथे बंगला with Terrace भाड्याने देणे आहे. बंगला १००० चौरस फूट. मागे २००० चौरस फूट लॉन, नारळाची झाडे. इच्छुक भाडेकरूंनी संपर्क साधावा ९८६७२१४६१६
- मांडवा जेट्टी येथील घर व घराच्या आजूबाजूचा परिसर साफ सफाई करण्यासाठी पुरुष/मुलगा पाहिजे.मासिक पगार रुपये ८०००/- ते १००००/- वयाची अट नाही. संपर्क : ८६९८६८२१२१
- रिसॉर्ट वर कामासाठी जोडपं पाहिजे आहे. Contact - 9607102357

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

टाटा रस्त्याच्या कामात हलगर्जीपणा

वाहन कालव्यात, सुदैवाने प्रवासी बचावले

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील भालीवडी टाटा रोड रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण अशी कामे सुरू आहेत. त्या रस्त्याच्या बाजूने कालवा जात असून, त्या ठिकाणी त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे तेथून जाणारे चारचाकी वाहन थेट नाल्यात कोसळले आणि त्यावेळी दैव बलवत्तर म्हणून गाडीमधील प्रवासी वाचले आहेत.

कर्जत-मुरबाड रस्त्यावरून टाटा कंपनीकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण आदी कामे सुरू आहेत. त्या रस्त्याच्या बाजूला राजनाला कालवा जात असून, सध्या तेथील नाल्यावर सार्वजनिक बांधकाम खात्याने कोणत्याही प्रकारची माहिती वाहनचालकांना दिलेली नाही. त्यामुळे २९ मार्च रोजी रात्रीच्या वेळी प्रवास करताना एक चार चाकी वाहन कोणताही अंदाज न आल्यामुळे नाल्यात कोसळले. तसेच रस्त्याच्या येथे कोणताही संरक्षक फलक लावला न गेल्यामुळे एक चारचाकी वाहन नाल्यात पडता पडता राहिले. स्थानिकांनी वेळीच मदत केल्याने सर्व प्रवाशांचे प्राण वाचू शकले.

पनवेलवरून भालीवडीला कार्यक्रमाकरिता प्रवास करणारे अशोक पवार आणि त्यांच्या पत्नी, सासू, सासरे चारचाकी इको फोर्ड वाहनाद्वारे जात होते. टाटा रोडचे काम सुरु असल्याने जुने भवानी माता मंदिरच्या मागून नाल्याला लागून रस्ता बनविला जात आहे.त्या वळणावर पनवेलवरून आलेले हे प्रवासी वळण रस्त्यावर नाल्याच्या किनाऱ्याला संरक्षण भिंत नसल्याने समोरून येणारे वाहन त्याची लाईट डोळ्यावर आल्याने समोरचा रस्ता अरुंद असल्याने (सूचना फलक नसल्याने) सदर वाहन नाल्याच्या उतारावर जाऊन हॅन्ड ब्रेक लावून चालकाने गाडी थांबवली. गाडीच्या काचा बंद असल्याने गाडी कळंडलेल्या स्थितीत असताना प्रवासी बाहेर येऊ शकत नव्हते. त्यावेळी सदर ठिकाणावरून प्रवास करणारे चोचीची वाडी गावचे योगेश देशमुख यांनी त्वरित शेजारुन जाणाऱ्या गाडीला मदतीसाठी आवाज दिला. त्यावेळी चेतन पवाळी आणि त्यांचे मित्र यांनी गाडी थांबवत चालकाच्या मदतीने दरवाजे उघडून प्रवाशांना बाहेर काढण्यास मदत केली.

दरम्यान, काम चालू असताना ठेकेदार आणि अभियंता यांनी बॅरिकेट्स व सूचना फलक न लावल्याने त्यांच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार काल घडला. या झालेल्या प्रकाराला जबाबदार कोण? अशा निष्काळजी करणाऱ्या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकावे आणि अभियंता यांच्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी सदर वाहन चालक करीत आहेत.

बोटी निघाल्या दर्यात

(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

मासेमारीसाठी कोळी बांधव पुन्हा सज्ज

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुडवएकदराकोळीवाड्यातील कोळी मच्छिमार बांधव होळी उत्सव साजरा करण्यासाठी मुंबईवरुन आपल्या बोटीतून गावी येत असतात. होळी उत्सव आनंदाने आटोपून पुन्हा आपल्या उदारनिर्वाहकरिता खोल समुद्रात जाण्यास कोळी बांधव सज्ज झाला आहे.

मुरुड येथील एकदरा पुलाखाली सहा सिलिंडर्सच्या शेकडो बोटींची डागडुजीची कामे पूर्ण करुन कोळी बांधव रंगपंचमीच्या मुहूर्तावर खोल समुद्रात जाण्यास सज्ज झाला असून, होड्यांमध्ये सामान भरण्याची रेलचेल सुरू झाली आहे. मोठ्या बोटींवर खोल समुद्रात मासेमारी करीत असताना दहा-पंधरा दिवस राहावे लागते. यासाठी मिळालेली मासळी ताजी राहावी यासाठी मोठ्या प्रमाणात बर्फ भरण्यात येत आहे. रॉकेल, डिझेल, महिनाभर पुरेल एवढे धान्य, खाद्यपदार्थ व विविध वस्तू बोटींवर भरण्यास सुरुवात केली आहे. विविध संकटांना सामोरे जाणारे मच्छिमार पुन्हा नव्या उमेदीने मासेमारी करण्यासाठी खोल दर्यात जाण्यास सज्ज झाले आहेत. संकटाचा काळ संपून मासेमारी मोठ्या प्रमाणात होऊन झालेला कर्ज फिटो, धंद्यात चांगला फायदा मिळावा, हीच प्रार्थना समस्त कोळी समाज करीत आहेत.

महावितरणचे प्रदीप पटवारी सेवानिवृत्त

। म्हसळा । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड म्हसळा उपविभागीय कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता प्रदीप किशनराव पटवारी दि. २८ मार्च रोजी नियतकाल वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. महावितरण कार्यालयाकडून त्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. पाच गाव आगरी समाज सभागृहात कार्यकारी अभियंता पाटील यांच्या अध्यक्षतेत हा कार्यक्रम पार पडला.

दरम्यान, प्रदीप पटवारी यांचे मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र आणि भेटवस्तू देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त अधिकारी विजय पटवारी यांनी महावितरण कंपनीत तब्बल ३३ वर्षे विविध ठिकाणी विविध पदांवर काम केले आहे.

सत्कार समारंभ कार्यक्रमास पत्रकार संजय खांबेटे, उद्योजक योगेश करडे, श्री व सौ निरनेसर, उमाकांत गुंडरे, प्राध्यापक शिसोदे, अभियंता नितीन पाटील, डॉ. रमेश भुगे, विभागीय कार्यालयाचे सर्व लाईनमन, कार्यालयीन कर्मचारी, मीटर वाचक सदस्य आणि मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचलन अभियंता राहुल यांनी केले, तर प्रास्ताविक मेंदडी विभागाच्या अभियंता पल्लवी तोडकर यांनी केले.

केंद्रप्रमुख श्वेता म्हात्रेंचे कार्य दिशादर्शक : शेडगे

। खरोशी । वार्ताहर ।

केंद्रप्रमुख श्वेता चंद्रकांत म्हात्रे यांनी केंद्रप्रमुखपदी कार्यरत असताना अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले असून, त्यांचे कार्य पुढच्या पिढीला नेहमीच दिशादर्शक राहतील, असे गौरवोद्गार रायगड जिल्हा परिषदेचे उपशिक्षण अधिकारी संतोष शेडगे यांनी श्वेता म्हात्रे यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमप्रसंगी काढले. ते पुढे म्हणाले की, शिक्षण विभागाच्या वेगवेगळ्या योजना आपल्या शाळांपर्यंत पोहोचवण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

वरसई, आंबेघर केंद्राच्या केंद्रप्रमुखा श्वेता म्हात्रे यांचा सेवापूर्ती सोहळा नुकताच एजी फार्म हाऊस, पेण येथे पार पडला. या कार्यक्रमासाठी पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी अरुणादेवी मोरे, जिल्हा परिषद शिक्षण विभाग कक्ष अधिकारी संजय कवित्के, अखिल भारतीय शिक्षक संघाचे कोकण अध्यक्ष प्रमोद पाटील, सेवानिवृत्त संघटनेचे जिल्हाचिटणीस अमरचंद पाटील, शिक्षक भारती संघटनेचे कोकण प्रांत अध्यक्ष ज.स. म्हात्रे, शिक्षक नेते जगदीश म्हात्रे, शिक्षक परिषदेचे तालुकाध्यक्ष महेंद्र गायकवाड, पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीचे संचालक मोहन भोईर, विठोबा पाटील, कैलास भोईर, आजी-माजी केंद्रप्रमुख व गागोदेव आंबेघर केंद्रातील शिक्षक वर्ग आदिसह शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केंद्रातील शिक्षकांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष सावंत यांनी केले.

ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे गुरे चोरीचा डाव फसला

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

दिवसेंदिवस गुरे चोरण्याचे प्रकार वाढत असून, रस्त्याच्या बाजूला चरण्यासाठी उभी असणारी उनाड गुरे बघून या गुरांना इंजेक्शन देऊन बेशुद्ध करुन ती गाडीमध्ये भरून चोरी केल्याच्या घटना घटत आहेत. परंतु, हेटवणे ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे गुरे चोरी करण्याचा प्रयत्न फसला.

शुक्रवार, दि २९ मार्च रोजी रात्री तीन वाजण्याच्या सुमारास राजेश निकम यांनी गाडीतून दोन माणसे उतरून गुरांना चारा घालून इंजेक्शन देऊन गाडी निघून गेली असल्याचे पाहिले. त्यांनी आजूबाजूच्या गजानन मोरे, संतोष निकम, कैलास निकम, विलास निकम, मुकुंद पाटेकर यांना फोन करुन झालेला प्रकार सांगितला. नंतर अर्धा तासांनी बेशुद्ध केलेली गुरे नेण्यासाठी गाडी आली; परंतु गाडी भरण्यासाठी सुरुवात करीत असताना ग्रामस्थ धावून गेले असता हे गुरे चोरी करणारे गाडीतून पळून गेले. ग्रामस्थांनी दगडफेक केली; परंतु गाडी पसार झाली. दरम्यान, ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे गुरे चोरण्याचा बेत फसला.

मुठवली खुर्द येथे शौचालयांची उभारणी

कोलाड लायन्स क्लबची सामाजिक बांधिलकी

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील मुठवली येथील ग्रामस्थांचे श्रद्धास्थान आराध्य दैवत भक्तांच्या हाकेला धावणारी नवसाला पावणारी, मनातील भक्तांना कौल देणारी देवी आई रत्नाई (भवानी माता) मंदिर सभागृह परिसरात येथे श्रध्देने येणाऱ्या भक्तांसाठी सुसज्ज असे शौचालय उभारण्यात आले आहे. लायन्स क्लब ऑफ कोलाड-रोहा यांच्या सामाजिक बांधिलकीतून उभारण्यात आलेल्या या शौचालयाचा उद्घाटन सोहळा नुकताच पार पडलाप.

लायन्सक्लबऑफइंटरनॅशनल ३२३१ ए ४ लायन्स क्लब ऑफ कोलाड-रोहा यांच्या वतीने तसेच जिल्हा उप प्रांतपाल एम.जे.एफ लायन संजीव सूर्यवंशी, लायन प्रवीण सरनाईक, लायन डॉ नमिता मिश्रा मॅडम, लायन महेश सावंत, लायन विजय कुमार गणात्रा, लायन रवींद्र घरत, लायन डॉ. यशवंत चित्रे, लायन आर.पी.पांडे, लायन अरविंद घरत, लायन प्रियदर्शनी पाटील, कला प्रिंटर, ऐरोली क्लब, अलिबाग क्लब, कोलाड लायन्स मेंबर्स यांच्या विशेष सौजन्याने तसेच ग्रामस्थ मुठवली खुर्द,ग्राम पंचायत मालसई यांच्या सहकार्याने येथे उभारण्यात आलेल्या एक लाख नव्वद हजार रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या शौचालयाचे उद्घाटन लायन्स क्लबचे माजी जिल्हा प्रांतपाल डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पीएमजेएफ लायन अनिल जाधव जिल्हा उप प्रांतपाल पीएमजेएफ लायन एन आर परमेश्वरन उप प्रांतपाल एमजेएफ लायन संजीव सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लायन रवींद्र लोखंडे यांनी केले, तर प्रास्तविक अध्यक्ष नरेश बिरगावले यांनी केले.

यावेळी प्रमुख मान्यवर लायन अनिल जाधव, एन आर परमेश्वरन, संजीव सुर्यवंशी, प्रियदर्शनी पाटील, डॉ यशवंत चित्रे, रवींद्र घरत यांनी मार्गदर्शन केले तसेच ग्रामस्थ म्हणून हभप राम सावंत यांनी लायन्स क्लबने गावासाठी केलेले हे महान कार्य असल्याचे सांगत ऋण व्यक्त केले. शेवटी लायन डॉ. श्याम लोखंडे यांनी आभार मानून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सायकलचोर पोलिसांच्या जाळ्यात

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवीन पनवेल परिसरात रहिवासी सोसायटीमधील लॉक न करता उभ्या केलेल्या तसेच रस्त्यावर उभ्या असलेल्या वेगवेगळ्या ठिकाणांवरील १६ सायकली चोरणाऱ्या विधीसंघर्षग्रस्त बालकास खांदेश्वर पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून जवळपास १ लाख ३५ हजार रुपये किमतीच्या एकूण १६ रेंजर सायकली हस्तगत केल्या आहेत. गेल्या काही दिवसापासून नवीन पनवेल, खांदेश्वर परिसरात महागड्या सायकली चोरीस जाण्याचे प्रमाण वाढले होते. यासंदर्भात अरुणकुमार गोस्वामी यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात सायकल चोरीचा गुन्हा दाखल केला होता. त्यानुसार पोलीस उपायुक्त परि ०२, विवेक पानसरे, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग अशोक राजपूत, वपोनि चंद्रकांत लांडगे, पोलीस निरीक्षक गुन्हे संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाई केली.

म्हसळ्यात रंगपंचमी उत्साहात

। म्हसळा । वार्ताहर ।

सालाबादप्रमाणे याही वर्षी म्हसळा शहरामध्ये रंगपंचमी उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. रंगपंचमीच्या उत्सवात छोट्या-छोट्या बच्चे कंपनीच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. दरवर्षी म्हसळा कुंभार समाजाच्या वतीने पारंपरिक पद्धतीने लहान मुलांतून राधा-कृष्ण, सुदामा, पेंद्या अशा प्रकारच्या भूमिका बजावणारी मुलं नटूनथटून बैलगाडीमध्ये रथ तयार करून त्यांची संपूर्ण शहरभरातून मिरवणूक काढण्यात आली. शेवटी हा रथ धावीर देव विराजमान झालेल्या ठिकाणी होळीच्या पटांगणात विसर्जित करण्यात आला.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

शासन दरबारी 'ज्योतिबाचा शोध जारी'

आता ज्योतिबा कुठे हे शोधण्याची वेळ आलीय

। पेण । वार्ताहर ।

शासनाने एका अध्यादेशात जाहीर केले की घटस्फोट झाल्यानंतर बायकोला तिचे आडनाव बदलायचे असेल तर त्यासाठी तिला त्याची संमती घ्यावी लागेल. या आदेशाचा निषेध आता सर्वत्र होत आहे. असे आदेश ऐकून आपण खरोखर पुरोगामी म्हणणाऱ्या महाराष्ट्रात व लोकशाहीत समान अधिकार संविधान असलेल्या देशात राहतो की अजूनही दुसऱ्या शतकात राहतो, हा प्रश्न पडतो. एकूणच, रूढी परंपरावादी पित्रुसत्ता आणि मनुस्मृतीची पकड समाजावर घट्ट करण्यासाठी स्त्रिया आणि शुद्रातिशूद्र, भटके विमुक्त आणि आदिवासी यांचे अधिकार वेठिला धरण्याचे धोरण सगळ्या माध्यमातून सरकार राबवत आहे, हे सिद्ध झाले.

लग्नानंतर बायकोने नाव आडनाव आयुष्यभर बदलणे ही रूढी स्त्री-पुरूष समानता मानणाऱ्या चळवळींनी कधीच झुगारली आहे, असे प्रतिपादन डॉ. वैशाली पाटील यांनी केले. त्या पेण येथे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. आमच्यासारख्या स्त्रिया ज्या माहेरचे किंवा आईवडिलांचे नाव लावतात, आपल्या मुलींनाही सहमतीने आईचे नाव देतात, त्या बंडखोर का ठरत असाव्यात? आणि ज्या स्त्रिया तसे लावू शकत नाहीत, त्यांना नॉर्मल, समाज नियम पाळणाऱ्या म्हणून का मानले जाते? आम्ही फुले, आंबेडकर, शाहू महाराज, जिजाऊ, सावित्रीबाई यांच्या राज्यात राहात आहोत.

एखाद्या पुरुषाने असली बंधने झुगारून आपल्या आईचे नाव लावल्याची उदाहरणे आमच्या स्वयंसेवी क्षेत्रात आहेत. पण, एखाद्या पुरुषाने व्यवस्था बदलासाठी बायकोचे नाव लावणे असा प्रतिकात्मक प्रयत्न का केला नसेल? म्हणूनच आता सावित्रीच्या लेकीला शोधण्यापेक्षा 'ज्योतिबा कुठे' हे समाजात बघण्याची वेळ आली आहे. खऱ्या अर्थाने पितृसत्ता तोडायला पुरूष बाहेर पडतील तेव्हा ती खरी समानतेची चुणूक असेल.

खरे तर, हा प्रश्न आपल्याला संपत्ती, घर, मालकी सोडण्यापासून तर 'जोरू का गुलाम' म्हणतील का इथपर्यंत याची नाळ जोडलेली आहे. आपल्या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हणून तर स्त्रियांच्या वारसा हक्कासाठी राजीनामा दिला. तो एक जात आधरित पितृसत्तेचा विरोध होता. परंतु, शासनाचे धोरण हे प्रतिगामी विचारांवर आधारित आहे, हे नुकत्याच घटस्फोटीत महिलेच्या नावबदलाच्या निर्णयाबाबतच्या शासकीय धोरणावरून स्पष्ट होते.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद.
गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

तमाम सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील, मे.एस.के.एन्टरप्रायझेस तर्फे प्रोप्रायटर, श्री. सचिन काशिनाथ शिगवण, यांनी व खालील वर्णनाची मिळकत ''ओम शिवम'' सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, अंतोरा रोड, आईस फॅक्टरी शेजारी ता. पेण, जिल्हा रायगड, ४०२१०७ यांच्याकडून विकसित करण्यासाठी घेतली आहे.

मिळकतीचे वर्णन

जिल्हा व तुकडी रायगड, पोटतुकडी व तालुका पेण, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पेण, दुय्यम निबंधक कार्यालय पेण, नगरपालिका परिषद पेण यांचे मुलकी हद्दीतील व कार्यक्षेत्रातील मौजे खुद्द पेण येथील, अंतोरे रोड, आईस फॅक्टरी जवळ या विभागातील बिनशेती अंतिम भूखंड क्र. ५ अ हिस्सा नंबर १ व २ मधील भूखंड क्रमांक १ चे एकूण क्षेत्र ४९७.२ चौरस मीटर व हिस्सा नं. २ चे क्षेत्र ४४२.६५ चौ. मीटर असे एकूण ९३९.८५ चौ. मी. क्षेत्र

ही मिळकत ''ओम शिवम'' सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांचे मालकीची असून सदर क्षेत्रामधील इमारतीचे पुनर्विकसस करण्यासाठी मे. एस.के. एन्टरप्रायझेस तर्फे प्रोप्रायटर, श्री. सचिन काशिनाथ शिगवण यांची नेमणूक केली आहे.

तरी सोसायटीमधील सभासदांना (आजी/ माजी) मालक यांना काही हरकती असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत खाली सही करणार यांचे पत्त्यावर किंवा ''ओम शिवम'' सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांचे कार्यालयात किंवा मे.एस.के.एन्टरप्रायझेस पेण यांना कळविण्यात याव्यात.

सदर नोटीस जनहितार्थ जाहीर केली आहे.

ठिकाण : पेण
दि. ३१/०३/२०२४ — अॅड. एम.ए.एरंडे

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुरज प्रभाकर गोंधळी वगैरे १८ रा. मु.पो. कुरूळ, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे. आर. पा)	आकार रु. पैसे
कुरूळ ता. अलिबाग	२	०-५०-०० पो.ख. ०-०७-०० एकूण ० ५७-००	११.८१

सदर वर नमूद ०-५७-०० हे. आर. या मिळकतीपैकी ०२८-५० हे. आर. मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदरहू जमिन अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबाकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २९/०३/२०१४

सही / -
अॅड. शैलेश प्रभाकर पाटील
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

नि व ड क

शाहीन आफ्रिदीची उचलबांगडी

लाहोर : पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने मोठा निर्णय घेतला असून त्यांनी स्टार फलंदाज बाबर आझमकडे पुन्हा एकदा वनडे आणि टी-२० संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली आहे. याबद्दल पीसीबीने रविवारी (दि.३१) माहिती दिली. पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नाकवी यांनी रविवारी बाबर आझमची अधिकृतरित्या पाकिस्तानच्या वनडे आणि टी संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती केली. याबाबत पीसीबीने ट्विटही केले आहे. दरम्यान, शाहीन आफ्रिदीला हटवून पीसीबीने पुन्हा बाबरकडे टी-२०

मयंकनची वेगवान गोलंदाजी

नवी दिल्ली : इंडियन प्रीमियर लीग २०२४ स्पर्धेत ११ व्या सामन्यात लखनौच्या २१ वर्षीय वेगवान गोलंदाज मयंक यादवने पंजाबचा कर्णधार शिखर धवनविरुद्ध ताशी १५५.८ किमी वेगाने चेंडू फेकला. हा यंदाच्या हंगामातील सर्वात वेगवान चेंडूही ठरला. या सामन्यात त्याचा वेग हा सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला. त्याने सातत्याने ताशी १४० ते १५५ किमी वेगाने गोलंदाजी करत पंजाबच्या फलंदाजांना भांडावून सोडले. विशेष म्हणजे याच सामन्यातून मयंकने आयपीएलमध्ये पदार्पणही केले,

फुटबॉल प्रशिक्षकास अटक

म्हापसा : दोन महिला फुटबॉल खेळाडूंचा विनयभंग करून त्यांना मारहाण केल्याप्रकरणी म्हापसा पोलिसांनी अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचा कार्यकारी समिती सदस्य हिमाचल प्रदेशमधील दीपक शर्मा यांच्याविरुद्ध शनिवारी गुन्हा दाखल केला व त्याला अटक करण्यात आली. याप्रकरणी हिमाचल प्रदेशातील खाड फुटबॉल अकादमी या क्लबची २१ वर्षीय महिला खेळाडू ही तक्रारदार आहे. तक्रारदाराच्या दाव्यानुसार, संशयिताने सदर कृत्य केले तेव्हा तो दारूच्या नशेत होता.

जखमी क्रिकेटप्रेमीचा मृत्यू

शिंगणापूर : हणमंतवाडी येथे टीव्हीवर आयपीएल क्रिकेटचा सामना बघत असताना, बुधवारी (दि.२७) रात्री दहाच्या सुमारास बंडू तिबिले व बळवंत झांजगे यांच्यात चेष्टा मस्करी सुरू झाली आणि त्याचे रूपांतर बाहेर आल्यानंतर मोठ्या भांडणात झाले. यावेळी बळवंत झांजगे व सागर झांजगे या चुलत्या-पुतण्यांनी लाकडी फळी व काठीचा वापर करत बंडोपंत बापू तिबिले यांना गंभीर जखमी केले होते. त्यांच्यावर सीपीआरमध्ये उपचार सुरू असताना शनिवारी त्यांचा मृत्यू झाला.

'या' फलंदाजांसह खेळणे भाग्यच

मुंबई : आयपीएलच्या निमित्ताने अगोदर रोहित शर्मा आणि आता विराट कोहली या क्रिकेट विश्वातील दोन महान फलंदाजांसह खेळायला मिळाले हे भाग्यच समजतो, असे कॅमेरून ग्रीनने सांगितले. ग्रीन गेल्या वर्षी मुंबई इंडियन्स संघात होता. यंदा खेळाडू अदलाबदलात त्याला बंगळूर संघाने घेतले. आधुनिक क्रिकेटमधील हे दोन फलंदाज खेळाकडे कसे पाहतात, कशी मानसिक तयारी करतात हे त्यांच्याकडून शिकायला मिळाले, कधी कधी यावर माझा विश्वास बसत नाही, असे ग्रीनने सांगितले.

आगरी चषकाचा मानकरी व्याघेश्वर रोठ खुर्द

। चणेरा । प्रतिनिधी ।
रोहा तालुक्यातील कोकबन येथील वाजंत्री क्रिडा नगरी येथे शुक्रवारी (दि.२९) रोजी राज्यमंत्री मिनक्षी पाटील यांच्या दु:खद निधनामुळे होणारी कब्बडी स्पर्धा रद्द करण्यात आली होती. ती स्पर्धा शनिवार (दि.३० रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत व्याघेश्वर रोठ खुर्द संघ ठरला आगरी चषकाचा मानकरी. यावेळभ जिल्ह्यातील नामवंत ३२ संघाने सहभाग नोंदविला होता.

■ रिशांक देवाडीका, अनंत वारगे यांची प्रमुख उपस्थिती

स्पर्धेत अंतिम लढत वाघेश्वर रोठ खुर्द व टि. बी. एम. कारावी या दोन बलाढ्य संघामध्ये झाली. वाघेश्वर रोठ संघाकडून धीरज खरीवळे यांच्या उत्कृष्ट चढाया व सनी भगत, आशिष मोरे यांनी केलेल्या अप्रतिम पकडीच्या जोरावर अंतिम लढतीमध्ये सहज विजय संपादित केला.

प्रथम क्रमांक वाघेश्वर रोठ संघास रोख रक्कम ५१,००० रुपये, द्वितीय क्रमांक टि.बि.एम. कारवी संघास २५००० रुपये, तृतीय क्रमांक जय हनुमान वाशी संघास १५००० रुपये व चतुर्थ क्रमांक वादळ खारिक वाडा संघास १५००० रुपये व भव्य चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच, पब्लिक हिरो खारिक वाडा संघाचा ओंकार मेस्त्री, उत्कृष्ट पक्कड जय हनुमान वाशी संघाचा विकास जोगडे, उत्कृष्ट चढाई टि. बि. एम. कारावी संघाचा करण पाटील व मालिकावीर रोठ खुर्द संघाचा ओंकार खेरटकर यांना रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत भेट देण्यासाठी प्रो कबड्डी खेळाडू रिशांक देवाडीका, राष्ट्रीय खेळाडू अनंत वारगे, अमित घाग, ॲड. मनोजकुमार शिंदे, तेजस्वीनी वाजंत्री, उद्देश वाडकर, मनोज भायतांडेल, संजय म्हात्रे व प्रमोद म्हात्रे यांनी या स्पर्धेला भेट दिली .

यावेळी हरिश्चंद्र मोरे, अनिल माळी, सचिव म्हात्रे, अतुल पाटील, हरीचंद्र वाजंत्री, सचिन मोरे, दिलिप म्हात्रे, नंदुकुमार म्हात्रे, रामचंद्र सपकाळ, रामाशेट म्हात्रे, हेमंत ठाकूर, तुषार वाजंत्री, हेमंत कांबळे, विठ्ठल मोरे, ज्ञानेश्वर मुंगळे, भरत मुंगळे, दिनेश कांबळे, जयवंत मुंगळे, प्रविण मोरे, संदेश मोरे, विलास डाके, शंकर दिवकर, वामन पारंगे, सुरेश पाटील, रामचंद्र मोरे, शंकर दिवकर, अमीत कांबळे, विठ्ठल मोरे, नरेश म्हात्रे, दत्ताराम मोरे, सुरेश पाटील, मोरेश्वर कोल्हटकर, अशोक ठाकूर, देवचंद म्हात्रे तसेच सर्व आगरी बाधंव यांनी स्पर्धेला अथंग मेहनत घेऊन स्पर्धा यशस्वी केली.

मियामी ओपनमध्येही बोपण्णाचा डंका

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताचा स्टार टेनिसपटू रोहन बोपण्णाने ऑस्ट्रेलियन साथीदार मॅथ्यू एब्डेनसह मियामी ओपन २०२४ या एटीपी मास्टर्स १००० स्पर्धेचे विजेतेपद जिंकत नवा विक्रम केला आहे.

शुक्रवारी (३०) झालेल्या पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात बोपण्णा आणि एब्डेन यांनी क्रोएशियाच्या इवान डोडिग व अमेरिकेचा त्याचा साथीदार ऑस्टीन क्रॅझीकेक या जोडीला पराभूत करत विजेतेपदाला गवसणी घातली. १ तास ४३ मिनिटे चाललेल्या अंतिम सामन्यात बोपण्णा-एब्डेन यांनी डोडिग-क्रॅझीकेक यांना ६-७(३), ६-३, १०-६ अशा फरकाने पराभूत केले.

बोपण्णा आणि एब्डेन यांनी जानेवारी महिन्यात ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धा जिंकली होती, त्यानंतर आता त्यांनी मियामी ओपन स्पर्धेतही विजेतेपद मिळवण्याचा कारनामा केला आहे. याबरोबरच ४४ वर्षीय बोपण्णा आणि एब्डेन

४४ व्या वर्षी रचला नवा विक्रम

पुन्हा जागतिक क्रमवारीत दुहेरीमध्ये अव्वल क्रमांकावर आले आहेत. याशिवाय बोपण्णा आणि एब्डेन यांचे एटीपी मास्टर्स १००० लेव्हलचे हे दुसरे विजेतेपद आहे. यापूर्वी या जोडीने इंडियन वेल्स २०२३ स्पर्धेत विजेतेपदाला गवसणी घातली होती.

याशिवाय आता बोपण्णाने एटीपी मास्टर्स १००० लेव्हलचे विजेतेपद मिळवणारा सर्वात वयस्कर खेळाडू ठरण्याचा स्वत:चाच विक्रम मोडला आहे. हा विक्रम त्याने गेल्यावर्षी ४३ वर्षे वय असताना केला होता.

सुवर्णपदक विजेत्यांची राष्ट्रीय
कराटे स्पर्धेकरिता निवड

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

कराटे डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्यावतीने महाराष्ट्र स्टेट कराटे चॅम्पियन्स २०२४ स्पर्धा मुंबई येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेत चॅम्पियन्स कराटे क्लबच्या खेळाडूंनी सहभाग घेऊन १२ सुवर्णपदके, ५ रौप्यपदके आणि ३ कांस्य पदके अशी एकूण २० पदके मिळविली. त्यातील १२ सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची देहरादून येथे होणाऱ्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेकरिता निवड झाली आहे.

राष्ट्रीय कराटे स्पर्धा या दि. ८ ते ११ मे दरम्यान देहरादून उत्तराखंड येथे होणार आहेत. सर्व खेळाडूंना महाराष्ट्राचे नाव उंचावण्याची एक सुवर्ण संधी मिळाली आहे.

सुवर्णपदक विजेते खेळाडू प्रसाद अवघडे, निखिल सोनकटाळे, शंतनु जाधव, हरिष सोलनकर, आदर्श गायकवाड, आदित्य धरावे, आकाश गुप्ता, काजल शिंदे, श्रावणी कोडवीलकर, पूर्वी आयरे.

ध्वजवाहकाच्या नियुक्तीवरून वाद कायम

। चेन्नई । वृत्तसंस्था ।

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय संघाचा ध्वजवाहक म्हणून टेबल टेनिसपटू अचंता शरथ कमलची नियुक्ती करण्यावरून वाद वाढतच आहे. तमिळनाडू ॲथलेटिक्स संघटनेने कमालला सामान्य दर्जाचा खेळाडू असे संबोधले असून, त्याच्या जागी ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राची ध्वजवाहक म्हणून निवड व्हायला हवी, अशी मागणी केली आहे.

भारताची जागतिक पदक विजेती लांब उडीपटू आणि भारतीय ॲथलेटिक्सची उपाध्यक्ष अंजू बॉबी जॉर्जनेही काही दिवसांपूर्वी अशीच मागणी केली होती. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने ध्वजवाहकाची नियुक्ती करण्यात घाई केली. नीरज चोप्राला डावलून शरथला हा सन्मान दिल्यामुळे देशभरातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. एका सामान्य खेळाडूच्या नेतृत्वाखाली चोप्राचा सहभाग ही कल्पनाच करू शकत नाही, असे तमिळनाडू ॲथलेटिक्स संघटनेने म्हटले आहे.

वर्ल्डकपसाठी संघ निवड एप्रिलअखेरीस

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयपीएलचा धुमधडाका देशात सुरू आहे. ही स्पर्धा अंतिम टप्प्यात असताना टी-२० विश्वकरंडक स्पर्धेसाठी भारताचा १५ सदस्यांचा संघ जाहीर केला जाणार आहे. आयपीएलचा पहिला टप्पा संपत येत असताना एप्रिल महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात निवड समितीची बैठक होईल, त्यात संघ निवडला जाणार आहे.

आयपीएलमुळे संभाव्य खेळाडूंचा फॉर्म आणि तंदुरुस्तीही तपासता येईल, असे बीसीसीआयच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्याने सांगितले. १९ मे रोजी आयपीएलचे अखेरचे साखळी सामना होणार असून अंतिम

सामना २६ मे रोजी होणार आहे. भारतीय संघात निवड झालेले काही खेळाडू आयपीएलचे साखळी सामने पूर्ण होताच न्यूयॉर्कला रवाना होतील. १ मे पर्यंत अंतिम खेळाडूंची यादी आयसीसीला कळवायची असल्या मुळे एप्रिलच्या अखेरच्या आठवड्यात संघ निवड करावी लागणार आहे. ही टी-२० विश्वकरंडक स्पर्धा वेस्ट इंडीज-अमेरिका येथे संयुक्तपणे होणार आहे. १ मे पर्यंत संघातील खेळाडूंची यादी देण्यात आली तरी त्यात २५ मे पर्यंत बदल करण्याची मुभा असणार आहे.

श्रीलंकेने कसोटीत नोंदवला भीमपराक्रम

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेने भारताचा १९७६ सालचा विक्रम मोडला आहे. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ५३१ धावा उभ्या केल्या आणि भारताचा ४८ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढून भीमपराक्रम केला.

श्रीलंकेच्या निशान मदुश्का (५७), दिमुथ करुणारत्ने (८६), कुसल मेंडीस (९३), दिनेश चंडीमल (५९), कर्णधार धनंजया डी सिल्वा (७०) यांनी दमदार कामगिरी करताना बांगलादेशच्या गोलंदाजांना चांगला चोप दिला. ६ बाद ४१९ धावांवर जयसूरियाचा झेल बांगलादेशच्या खेळाडूंनी घेतला. त्याला

२८ धावाच करता आल्या. कमिंदू मेंडिस एकाबाजूने दमदार फटकेबाजी करत होता. मात्र, बांगलादेशच्या गोलंदाजांना श्रीलंकेचे शेपूट गुंडाळण्यात यश आले. मेंडिस १६७ चेंडूंत ७

भारताचा १९७६ सालचा विक्रम मोडला

चौकार व २ षटकारांसह ९२ धावांवर नाबाद राहिला. त्यांचा पहिला डाव १५९ षटकांत ५३१ धावांवर गडगडला. कुशल (९३) व कमिंदू (९२) यांना शतकाने हुकलावणी दिली.

कसोटी क्रिकेटमध्ये डावात एकाही फलंदाजाचे शतक पूर्ण न होता एखाद्या संघाने उभ्या केलेल्या सर्वोत्तम धावसंख्येचा विक्रम नावावर केला. श्रीलंकेच्या ५३१ धावांमध्ये एकाही फलंदाजाचे शतक पूर्ण झालेले नाही. यापूर्वी १९७६ मध्ये भारताने न्यूझीलंडविरुद्ध ९ बाद ५२४ धावांवर डाव घोषित केला होता. एकाही फलंदाजाचे शतक न होता उभ्या राहिलेल्या या सर्वोत्तम धावा होत्या. पण, हा विक्रम आता श्रीलंकेच्या नावावर झाला आहे.

विश्वचषकात स्थान मिळवणे जिकरीचे

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि अष्टपैलू रवींद्र जडेजा यांचे स्थान टी-२० विश्वचषकात निश्चित असेल. रोहित आणि विराट या दोन्ही अनुभवी खेळाडूंच्या तुलनेत युवा खेळाडूंना स्थान मिळावे, अशीच चर्चा रंगते. त्याचवेळी मोठ्या धावा उभारण्यास, सामना जिंकून देण्यास कोण उपयुक्त ठरतात? हेच दोन खेळाडू. दोघांकडे क्लास आणि अनुभव आहे. त्यामुळे त्यांचे स्थान युवांना द्यावे, ही चर्चा निष्फळ ठरते.

बुमराहसारखा जगात दुसरा उत्कृष्ट वेगवान गोलंदाज नाही. इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिकेत त्याने यशस्वी मारा केला. आता आयपीएलमध्येही भेदक ठरत आहे. अष्टपैलू जडेजाचे आकडे प्रभावी वाटत नसले तरी तो चेन्नईचा स्तंभ आहे. त्यामुळे सर्व अनुभवी चेहऱ्यांना प्राधान्याने

संघात स्थान देण्यास हरकत नाही. आता प्रश्न उरतो की, यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, ऋतुराज गायकवाड या युवा खेळाडूंचे काय? हे सर्व जण भारताचे प्रतिनिधित्व करीत असतात. पण, विश्वचषक संघात स्थान मिळविणे आणि ते टिकविणे यासाठी कठोर मेहनतीची गरज असेल.

विदर्भ एक्स्प्रेसला गुजरातकडून संधी

। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।

हैदराबादविरोधात अहमदाबाद येथे सुरु असलेल्या सामन्यात गुजरातच्या ताफ्यात दोन बदल करण्यात आले. स्पेन्सर जॉनसन याच्या जागी विदर्भाच्या दर्शन नळकांडे याला गुजरातने स्थान दिले आहे. दर्शन नळकांडे याला २०१८ मध्ये पंजाब किंग्स संघाने विकत घतले होते. पण त्याला प्लेइंग ११ मध्ये खेळण्याची संधी मिळाली नाही. पण गुजरातने दर्शन याला खेळण्याची संधी दिली आहे.

विदर्भाचा वेगवान गोलंदाज दर्शन नळकांडे याला गुजरात टायटन्सने २०२२ च्या लिलावात २० लाख रुपयांच्या मूळ किंमतीत विकत घेतले होते. २०२२ च्या हंगामात गुजरातकडून दर्शन याने आयपीएलमध्ये पदार्पण केले. आतापर्यंत त्याला फक्त

तीन सामन्यात खेळण्याची संधी मिळाली होती. यामध्ये त्याने तीन विकेट घेतल्या आहेत. २०१९ मध्ये दर्शन याने हिमाचलप्रदेशविरोधात विदर्भाकडून टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण केले. आतापर्यंत देशांतर्गत क्रिकेटमध्ये दर्शन याने आपल्या कामगिरीने सर्वांनाच प्रभावित केले आहे.

दर्शनची आतापर्यंतची कामगिरी

दर्शन हा अष्टपैलू खेळाडू आहे. गोलंदाजीसोबत फलंदाजीमध्येही आपले योगदान देतो. विशेषकरुन शेवटच्या शटकांमध्ये चांगली फलंदाजीही करतो. दर्शनने 'मुश्ताक अली टी-२०' स्पर्धेत चार चेंडूत चार बळी घेतले होते. असा पराक्रम करणारा तो भारताचा दुसरा तर जगातला नववा गोलंदाज ठरला होता. गेल्यावर्षी मुश्ताक अली करंडक टी-२० स्पर्धेत दर्शननं १३ बळी घेत टॉप ५ मध्ये स्थान पटकावले. गेल्या तीन वर्षांपासून दर्शन मुश्ताक अली करंडक टी-२० स्पर्धेत टॉप ५ मध्ये आहे. या स्पर्धेत तीन वर्षांत दर्शनच्या नावावर ४० विकेट्सची नोंद.

जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धा
कर्नाळा स्पोर्टस् संघ विजेता

। खारेपाट । वार्ताहर ।
अलिबाग तालुक्यातील टाका देवी स्पोर्ट क्लब मांडवा व ग्रामस्थ मंडळ आयोजित जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेत स्वर्गीय रुची पाटील चषक २०२४ चा मानकरी कर्नाळा स्पोर्ट क्लब पनवेल हा संघ ठरला. तर, टाकादेवी स्पोर्ट क्लब मांडवा उपविजेता तसेच ओंकार वेश्वी संघ तृतीय क्रमांक व भिलालेश्वर किहीम संघ चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला.

या स्पर्धा रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने टाकादेवी क्रीडा नगरीत संपन्न झाल्या. स्पर्धेत उत्कृष्ट चढाई ईशा पाटील वेश्वी, मालिकावीर तेजा सकपाल कर्नाळा स्पोर्टस्, उत्कृष्ट पकड चैताली म्हात्रे कीहिम, पब्लिक हिरो नमिषा म्हात्रे टाका देवी स्पोर्ट मांडवा यांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील नामवंत सोळा संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघातील खेळाडूंची निवड करून त्यांना सामनावीर पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)